संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

✲ वर्ष ५१ ✲ अंक २५३ ✲ ✲ अकोला ✲ रविवार, दिनांक ०९ मार्च २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## थोडक्यात..

### हरियाणाच्या तरुणाला सिडनीत ४० वर्षांची शिक्षा

**रेवाडी :** हरियाणाच्या बालेश धनखडला कोरियन महिलांवर बलात्कार केल्याबद्दल सिडनी न्यायालयाने ४० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे, ३० वर्षे गैर पॅरोल कालावधी असेल. जेव्हा तो त्याची ४० वर्षांची शिक्षा पूर्ण करेल तेव्हा धनखड ८३ वर्षांचा असेल.

मूळचा रेवाडीतील सेक्टर-३ येथील बालेश धनखड २००६ मध्ये विद्यार्थी म्हणून ऑस्ट्रेलियाला गेला होता, जिथे शिक्षणानंतर त्याने एबीसी, ब्रिटिश अमेरिकन टोबॅको, टोयोटा आणि सिडनी ट्रेन्स यासारख्या प्रमुख कंपन्यांमध्ये डेटा व्हिज्युअलायझेशन सल्लागार म्हणून काम केले. या काळात त्याने कोरियन वंशाच्या ५ महिलांवर बलात्कार केला. बालेश धनखडला २०१८ मध्ये अटक करण्यात आली होती.

बालेश धनखड हा ओव्हरसीज फ्रेंड्स ऑफ भाजपचा ऑस्ट्रेलियन अध्यक्ष राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलियाला गेले तेव्हा बालेश धनखड त्यांचे स्वागत करताना उत्साहित होता. धनखडने हिंदू कौन्सिल ऑफ ऑस्ट्रेलियाचा प्रवक्ता म्हणून काम पाहिले होते.

# मी माझ्या घरातला शेवटचा राजकारणी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८ :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या राजकीय वारसदाराविषयी प्रथमच भाष्य केले आहे. फडणवीसांची मुलगी त्यांचा राजकारणाचा वारसा पुढे चालवेल असा दावा करतात. पण आता स्वतः फडणवीसांनीच आपण आपल्या मुलीकडे राजकीय वारसदार म्हणून कधीही पाहणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. मी माझ्या घराण्यातला शेवटचा राजकारणी असल्याचेही ते म्हणाले.

मुंबईत आज राज्यस्तरीय बेटी बचाओ, बेटी पढाओ समारोप व कन्यारत्न सन्मान कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी महिलांच्या सामाजिक योगदानावर भाष्य करताना आपली कन्या दिवीजाच्या भावी वाटचालीवरही प्रकाश टाकला.



फडणवीस म्हणाले, कुटुंबात एकतरी मुलगा असावा असा अप्रत्यक्ष सामाजिक दबाव अनेकांवर असतो. पण मी माझ्या एका मुलीवरच खुश आहे. आजच्या काळात मुलांपेक्षा मुलीच आई-वडिलांची जास्त काळजी घेतात. मी स्वतः मुलीचा बाप आहे. त्यामुळे मी हे ठामपणे सांगू शकतो.

मी माझ्या मुलीकडे राजकीय वारसदार म्हणून केव्हाही पाहणार नाही. दिवीजाची कायद्याचे शिक्षण घेण्याची इच्छा आहे. त्यामुळे मी माझ्या घराण्यातला शेवटचा राजकारणी ठरेल.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी राज्यातील महिलांच्या राजकीय सहभागावरही भाष्य केले. महाराष्ट्रातील महिलांचा राजकारणातील सहभाग वाढत आहे. मी राजकारणात प्रवेश केला तेव्हा पदावर असणाऱ्या महिलांचे 80 टक्के पतीच त्यांचे काम पहायचे. 1997 पर्यंत हा आकडा 50 टक्क्यांपर्यंत घसरला. 2029 मध्ये परिस्थितीत मोठा बदल होईल. राजकारणात एक तृतीयांश महिला दिसून येतील, असा विश्वास त्यांनी बोलून दाखविला.

## एक खून करण्याची परवानगी द्या

### रोहिणी खडसे यांची राष्ट्रपतीकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८ :**



जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्तीचा गौरव केला जात असतानाच, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणीताई खडसे यांनी एक धक्कादायक मागणी केली आहे. "आम्हाला खून करण्याची परवानगी द्या," अशी थेट मागणी त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे केली आहे. त्यांनी यासंदर्भात एक पत्र सोशल मीडियावर प्रसिद्ध केले असून, देशातील महिलांच्या वाढत्या असुरक्षिततेबाबत संताप व्यक्त केला आहे.

खडसे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, "महात्मा बुद्ध आणि महात्मा गांधी यांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. हा अहिंसेचा देश आहे, याची मला जाणीव आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीमुळे आम्ही ही मागणी करत आहोत. महिलांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. नुकतीच मुंबईत एका १२ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्काराची धक्कादायक घटना घडली. या घटनेने आम्हाला सुन्न केले आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत भारताची स्थिती अत्यंत वाईट आहे."

खडसे पुढे म्हणतात, "नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यू सर्व्हेनुसार भारत हा महिलांसाठी सर्वात असुरक्षित देश ठरला आहे. अपहरण, घरगुती हिंसाचार, महिलांचा छळ यासारख्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही महिलांना एक खून माफ करण्याची संधी द्यावी, अशी मागणी करीत आहोत. आम्हाला अत्याचारी मानसिकतेचा, बलात्कारी प्रवृत्तीचा आणि निष्क्रिय कायदा-सुव्यवस्थेचा खून करायचा आहे."

रोहिणी खडसे यांनी ऐतिहासिक महिलांचा संदर्भ देत म्हटले आहे, "महाराणी ताराराणी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजाच्या रक्षणासाठी तलवार उपसली होती. मग आम्ही का मागे राहावे? महिलांचे रक्षण आणि समाज सुधारण्यासाठी कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे."

खडसे यांनी राष्ट्रपतींकडे आपल्या मागणीचा सकारात्मक विचार करण्याची विनंती केली आहे. "आपण आमच्या मागणीचा विचार करून आम्हाला जागतिक महिला दिनाची खरी भेट द्यावी," असे त्यांनी आपल्या पत्राच्या शेवटी नमूद केले आहे. त्यांच्या या पत्रावर आता विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत असून, महिला सुरक्षेबाबत आवाज उठला आहे.

**कोणाचा खून?**

रोहिणी खडसे कोणाचा खून करत आहेत..हे त्यांनी सांगावे, या शब्दात शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी रोहिणी खडसे यांना टोला लगावला आहे. रोहिणी खडसे काय म्हणाल्या मला त्याबाबत माहिती नाही. मात्र त्या कोणाचा खून करीत आहेत त्याचं नाव त्यांनी सांगावं असे पाटील म्हणाले . तीच ढाल तीच तलवार तीच जबाबदारी आता तुला घ्यायची आहे..शेळी नको मला आता वाघीण बघायची आहे. अशा पद्धतीचे चित्र आता महिलांमध्ये निर्माण झालं पाहिजे असे पाटील यावेळी म्हणाले.

# सेवाग्राम येथून शक्तीपीठ महामार्ग

### पालकमंत्री भोयर यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ८ :**

देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचे केंद्र स्थान असलेल्या सेवाग्रामच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. राज्य सरकारच्या शक्तीपीठ महामार्गाची सुरूवात सेवाग्राम येथून होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात केल्याने जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी फडणवीस यांचे आभार मानले.

सेवाग्राम गावाची ओळख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आहे. भाजपा सरकारने सेवाग्रामला पुन्हा एक अनोखी भेट दिली आहे. नागपूर ते गोवा या शक्तीपीठ महामार्गाची सुरूवात वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथून होणार आहे. 802 किमीच्या या मार्गामुळे विदर्भ व मराठवाडयाची कनेक्टीविटी वाढणार असून, कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची भवानी माता, माहूरची रेणूका



माता, अंबेजोगाईची योगेश्वरी माता आदी शक्तीपीठे एकमेकांशी जोडल्या जाणार आहेते. परळी वैजनाथ, औंढा नागनाथ सह अन्य तिर्थस्थळे देखील मागार्शी जोडली जाणार असल्याने हा महामार्ग पर्यटनासोबतच मराठवाडा व विदर्भाच्या विकासाला गती देणारा ठरणार आहे.

मार्ग 12 जिल्ह्यातून जाणार आहे. समृद्धी महामार्गाशी जिल्ह्याला जोडल्या नंतर आता शक्तीपीठ महामार्ग देखील जिल्ह्यातून जात असल्याने जिल्ह्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. आज पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे भेट घेऊन आभार मानले. या द्रुतगती मार्गामुळे मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्र व तीर्थस्थळे जोडण्यात येणार असून प्रवाशांच्या वेळेची बचत होईल, असा विश्वास पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केला.

## धर्मांतर करवणाऱ्यांना मृत्युदंड!

■ **वृत्तसंस्था, भोपाळ, दि. ८:**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त भोपाळमधील कुशाभाऊ ठाकरे कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले की, धर्मांतर करवणाऱ्यांसाठी मृत्युदंडाची तरतूद केली जाणार आहे. अशांना सोडले जाणार नाही.

या कार्यक्रमात त्यांनी लाडली बहना योजनेअंतर्गत १.२७ कोटी महिलांच्या खात्यात १२५० रुपये हस्तांतरित केले. मार्च २०२५ साठी अंदाजे १५५२.७३ कोटी रुपये एका क्लिकवर हस्तांतरित करण्यात आले आहेत.

## एसटीचे स्टेअरींग सरनाईकांच्या हाती

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८ :**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही काळापुरते संजय सेठी यांची नियुक्ती केली होती, मात्र आता सरनाईक यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी सरनाईक यांची नियुक्ती म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात कोणताही दुरावा नसल्याचा स्पष्ट संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांचे निकटवर्तीय असलेल्या सरनाईक यांना परिवहन मंत्री म्हणून जबाबदारी दिल्यानंतर त्यांच्या कामगिरीबाबत समाधान व्यक्त करण्यात आले होते. त्यानंतर आता महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

एसटी महामंडळ राज्यभरातील प्रवाशांसाठी महत्त्वाची सेवा बजावते. महामंडळाच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करणे, कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भातील प्रश्न सोडवणे आणि सेवा अधिक प्रभावी करणे यांसारख्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सरनाईक यांच्यावर मोठी जबाबदारी असेल. त्यांच्या नेतृत्वाखाली महामंडळाची सेवा अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.









# शिंदे आणि मुख्यमंत्र्यांमध्ये 'वॉर' सुरू

## खासदार संजय राऊत यांचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई , दि. ८ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जे बोलायचे ते बोलू द्या. त्यांना उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करू द्या, कारण त्यांना दुसरे काम नाही. मात्र, एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांच्यामध्ये कसा वॉर किंवा युद्ध सुरू आहे, हे स्पष्ट दिसत आहे. ते रोजच दिसून येत असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.



या संदर्भात संजय राऊत म्हणाले की, या आधीच्या सरकारने विशेषतः नगर विकास विभागाने जे निर्णय घेतले होते. ज्यामुळे भ्रष्टाचार होत होता, असे निर्णय देवेंद्र फडणवीस यांनी थांबवले आहेत. त्याबद्दल आम्ही त्यांचे स्वागत केले आहे. अशाच निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी देखील स्थगिती दिली होती. ज्यातून भ्रष्टाचाराला चालना मिळेल, त्यातून दलालांना चालला मिळेल, अशाच निर्णयांना उद्धव ठाकरे यांनी स्थगिती दिली होती. त्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांचे अभिनंदन करायला हवे होते. ज्या पद्धतीने भ्रष्टाचाराला चालना देणारे निर्णय तुम्ही थांबवले, याबद्दल आम्ही तुमचे अभिनंदन केले असल्याचे ते म्हणाले. आम्ही रडीचा डाव खेळत नसल्याचा दावा देखील राऊत यांनी केला आहे.

### एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर

एकनाथ शिंदे यांच्या बोलण्याला महाराष्ट्राला तसे महत्त्व राहिलेले नाही. जे मुख्यमंत्री बोलतात त्याला महत्त्व असते. त्यामुळे एकनाथ शिंदे आता कोण आहेत? त्यांचे आता कोणीही ऐकणार नाही. ते केवळ लिहून दिलेले भाषण वाचतात.


याच्यातून काहीही साध्य होणार नाही. शिंदे यांनी राज्यासाठी काय केले? जनतेसाठी काय केले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. बहिरजी शिंदे यांच्या नावाने पुरस्कार विकत घ्यायचा, यापलीकडे त्यांचे भविष्य काय? असा प्रश्न देखील राऊत यांनी विचारला आहे. या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केलेल्या टीकेला संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

### भाजपने हिंदुत्व सोडले होते

२०१४ ला भारतीय जनता पक्षाने आमच्याशी युती तोडून हिंदुत्व सोडले होते. त्यानंतर २०१९ ला आम्ही जे केले त्यात देखील एकनाथ शिंदे आमच्या सोबत होते. त्यामुळे शिंदे यांचा अभ्यास खूप कमी आहे. त्यांना नव्याने शाळेत जावे लागेल. माणसाच्या डोक्यावरती टांगती तलवार असेल तर तो, असे बोलत असतो. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्याकडे फार गांभीर्याने पाहू नका, असा सल्ला राऊत यांनी दिला आहे.

## महाराष्ट्रात तापमानाचा भडका उडणार?

### चार दिवसांत उष्णतेची लाट



**मुंबई , दि. ८ :** आता देशातील हवामान बदलणार आहे. येत्या दोन दिवसांत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेशसह देशातील ९ राज्यांमध्ये उष्णता वेगाने वाढेल. खासगी हवामान एजन्सी स्कायमेटच्या मते, अफगाणिस्तानवर वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय आहे. ते ९ मार्चच्या रात्री जम्मू आणि काश्मीरला पोहोचेल. महाराष्ट्रात उत्तरेऐवजी पूर्वेकडून वारे वाहू लागतील. यामुळे पुढील तीन-चार दिवसांत खूप उष्णता जाणवेल. १०-११मार्च रोजी मध्य महाराष्ट्रात उष्णतेची लाट येऊ शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. हवामान एजन्सीच्या मते, यानंतरही सलग दोन-तीनपश्चिमी डिस्टर्बन्स निर्माण होतील. त्यांच्यात फरक नसल्याने, उत्तरेकडील वारे वाहू शकणार नाहीत आणि थंडी संपेल. यामुळे १५-१६ मार्चपर्यंत तापमान जास्त राहील. दरम्यान, रात्रीचे तापमानही वाढेल आणि सकाळ आणि रात्रीची थंडी संपेल. ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ डॉ. वेद प्रकाश सिंह म्हणाले की, होळीच्या दिवशी (१३-१४ मार्च) मध्य प्रदेशातील बहुतेक भागात दिवसाचे तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते.

# सतीश भोसलेचा आणखी एक कारनामा

## सापळे, धारदार शस्त्रे, जाळी, वाघूरसह आक्षेपार्ह साहित्य जप्त

■ **महासागर प्रतिनिधी,**

**बीड , दि. ८ :** बीड मधील भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी आणि आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेल्या सतीश भोसले याचा आणखी एक कारनामा समोर आला आहे. सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याच्या घराची वन विभागाच्या वतीने झाडाझडती घेण्यात आली असून त्याच्या घरातून मोठ्या प्रमाणात प्राण्यांना पकडण्यासाठी लावण्यात येणारे सापळे तसेच शिकार केल्यानंतर मास खाण्यासाठी लागणारे साहित्य हाती लागले आहे. त्यामुळे आता सतीश भोसले हा हरणांना पकडून त्यांची शिकार करून त्यांचे मास खात होता, हा आरोप सिद्ध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



शिरूर कासार येथे एका व्यक्तीला मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सतीश भोसले याच्यावर अनेक गंभीर आरोप होत आहे. त्याचे अनेक व्हिडिओ देखील समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. मग त्यात पैशांचा नोटा उडवतानाचा व्हिडिओ असो किंवा हेलिकॉप्टर मधून उतरताना चा व्हिडिओ असो. यातच आता सतीश भोसले हरिणाची शिकार करून मास खात होता, असा आरोप करण्यात येत होता. त्यानुसार वन विभागाने त्याच्या घराची झाडाझडती घेतली असता त्याच्या घरात अनेक आक्षेपार्ह साहित्य आढळले आहे. या साहित्याची तपासणी आता वन विभागाच्या वतीने केली जात आहे.

### ४० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिळून केली कारवाई

वन विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याच्या घरावर छापा टाकाला होता. या तपासात वन्य प्राण्यांना पकडण्यासाठी वापरण्यात येणारे सापळे, धारदार शास्त्र, जाळी, वाघूर आणि इतर बरेच साहित्य आढळून आले आहे. जिल्हा वन अधिकारी अमोल गरकळ यांच्या मार्गदर्शनाखाली ४० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिळून ही कारवाई केली. यामध्ये मोर आणि हरिण मारणारे जाळे देखील आढळून आले आहेत.

तर यात आढळलेले मांस हे एक महिन्यापूर्वीचे असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र, हे मांस नेमके कोणत्या वन्यप्राण्याचे आहे? हे तपासानंतरच स्पष्ट होईल.

### कोण आहे सतीश भोसले?

सतीश भोसले हा मागील ५ वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहे. शिरूर कासार तालुक्यातील झापेवाडी येथील तो रहिवासी आहे. भाजपच्या महाराष्ट्र भटके विमुक्त आघाडीचे पद त्याच्याकडे आहे. त्याच्यावर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. अलीकडच्या काळात तो सुरेश धस यांच्या संपर्कात आला.

त्यातून त्यांची जवळीक वाढली. सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याची ओळख निर्माण झाल्याने त्याचा परिसरात दबदबा निर्माण झाला. पण आता त्याचे वेगवेगळे व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे सतीश भोसले व पर्यायाने सुरेश धस यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

# संतोष देशमुखांसमोर 'शहीद' हा शब्द लागावा

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी,**

**बीड , दि. ८ :** संतोष देशमुख यांच्या समोर हत्या झाली असा नव्हे तर 'शहीद' हा शब्द लागू शकतो. त्यांचा जो बळी गेलाय, तो एका प्रवृत्तीच्या विरोधात गेला आहे. त्या प्रवृत्तीला नष्ट करण्याचा विडा आपण सर्वांनी उचलायला हवा, त्यामुळे काँग्रेसच्या वतीने सद्भावना रॅली काढण्यात आली असल्याचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. भारताच्या डीएनए मध्ये आणि भारताच्या संविधानामध्ये देखील सद्भावना असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणासंदर्भात काँग्रेसच्या वतीने मस्साजोग ते बीड अशी सद्भावना रॅली काढण्यात येत आहे. या रॅलीची सुरुवात आज झाली. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते.



ज्या विचारांचे आपण पाईक आहोत. ती शुद्ध भावना आमच्या मनात आहे. ही घटना घडल्यापासून देशमुख कुटुंबीयांचा आणि त्यांच्या कन्येचा बोलताना कुठेही तोल गेलेला नाही. त्यांनी सातत्याने विवेकपूर्ण विचार सर्वांसमोर मांडला आहे. विवेकवादी म्हणून ते आपल्या सर्वांच्या समोर आले आहेत. या परिवाराने सद्भावना जोपासली आहे. त्यांनी कोणत्या धर्माला, कोणत्या जातीला नावे ठेवलेली नाही. त्यामुळे वाईट प्रवृत्ती विरोधात आपण सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

### फोडा-तोडआणि राज्य करा ही प्रवृत्ती

देशमुख कुटुंबीयांनी सद्भावनेचे संरक्षण आणि रक्षण केले आहे. याच सद्भावनेचा ठेवा, त्यांचा संदेश आपण सर्वांनी आत्मसात करायला हवा. राज्यात रोज वेगवेगळ्या घटना घडत आहेत. त्यामुळे आपला समाज बधीर झालाय का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आपण साधू संतांचे, महापुरुषांची नावे घेतो. संविधानाचे नाव घेतो, त्यावेळी सर्वांची शिकवण ही सद्भावनाच असल्याचे आपल्या लक्षात येते. या सद्भावण्याच्या विरोधात कोण आहे? याचा थोडा विचार केल्यास फोडा-तोडआणि राज्य करा, प्रवृत्ती या विरोधात असल्याचे दिसते. ही प्रवृत्ती आज जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचेही ते म्हणाले.

### केवळ शुद्ध स्वरूपात आमची पदयात्रा

अलीकडच्या काळात कुठल्याही निवडणुका नाही. तरी देखील केवळ शुद्ध स्वरूपात आमची ही पदयात्रा आहे. क्रूर पद्धतीने हसून गुन्हेगार हत्या करतात? हा समाज कसा निर्माण झाला? यामुळे माझ्या मनात देखील मला शरमिंदा होण्याची वेळ आली आहे.

त्यामुळे माझ्या संवेदना देशमुख परिवाराप्रती मी व्यक्त करतो. तसेच जी सद्भावना त्यांनी जोपासली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. हीच भावना आपल्या लोकशाहीची संरक्षक असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे.

## शिवारात बिबट्या जेरबंद



**ठाणगाव :** येथील बुरकुलपट्टी येथील गव्हाच्या शेतात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या मादी जेरबंद झाल्याची घटना शुक्रवार (दि.७ ) पहाटेच्या सुमारास घडली. दरम्यान, बिबट्या मादी जेरबंद झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. काही दिवसांपासून बिबट्याने परिसरात धुमाकूळ घातला होता. सात दिवसांपूर्वी ठाणगाव-केळीरोडवर वास्तव्यास असलेले बाळासाहेब वसंत काकड हे सकाळी फेरफटका मारत असताना सकाळी आठ वाजता यांच्यावर बिबट्याने हल्ला केला होता, त्यात बाळासाहेब काकड यांच्या तोंडाला चावा घेतला होता तेव्हा परिसरातील शेतकऱ्यांनी पिंजरा लावण्याची मागणी केली होती. यावेळी वनपरिक्षेत्राधिकारी एच. एस. पारेकर, वन परिमंडळ अधिकारी एस. पी. झोपे, वनरक्षक किरण गोरडे यांच्या मार्गदर्शनाने काकड यांच्या गट क्रमांक ४४१ गव्हाच्या शेतात वन कर्मचाऱ्यांनी पिंजरा लावला होता.

# १८ व्या मिनिटाला आग आटोक्यात : मोठी दुर्घटना टळली



■ **महासागर प्रतिनिधी,**

**मनमाड , दि. ८ :** मनमाड शहरापासून १७ किलोमीटर अंतरावर इंदूर -पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील मनमाड मालेगाव मार्गावर निंबायती येथे भूमिगत टाकण्यात आलेल्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या इंधन वाहतूक करणाऱ्या पाइपलाइनमधून इंधन गळती सुरू होऊन अचानक आगीचा भडका उडाल्याने एकच खळबळ उडाली. मालेगाव आणि नांदगाव तालुक्यात सर्वत्र धोक्याचे सायरन वाजले. नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकला. तातडीने सर्व सुरक्षा यंत्रणा अत्याधुनिक साहित्य साधनांसह घटनास्थळी दाखल झाल्याने अवघ्या व्या मिनिटाला ही आग आटोक्यात येत मोठी दुर्घटना टळली.

त्यामुळे सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. पण ही काही प्रत्यक्षात आग नव्हती तर फायर मॉकड्रिल अर्थात आग सुरक्षा प्रात्यक्षिके होती. सर्व सुरक्षा यंत्रणांसह शासकीय यंत्रणा या प्रात्यक्षिकात सहभागी झाल्या होत्या. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनची पाइपलाइन काहिली (गुजरात) येथून भूमिगतपणे टाकण्यात आली आहे. इंधन वाहिनीचा मनमाडमार्गे पानेवाडीतील कंपनीतून पुढे सोलापूरपर्यंत विस्तार केला आहे. यातून डिझेलसह पेट्रोलचा पुरवठा तेल कंपन्यांच्या डेपोला केला जातो. याचा लाभ धुळे, नाशिक, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, सांगली, धाराशिव, बीड या जिल्ह्यांसाठी केला जातो. ही भूमिगत इंधन वाहिनी हाय इन्फ्लेमेशन आणि प्रगत तंत्रज्ञानाने बनवलेली आहे. शुक्रवारी सकाळी ११.३५: च्या सुमारास महामार्गाजवळील निंबायती गावातील शिवारात सकाळच्या वातावरणात इंधनाचा वास येऊ लागला.

त्यामुळे ग्रामस्थांनी तातडीने पाइपलाइन विभागाला याची माहिती दिली. सुरक्षा गस्ती पथकाने घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी पाइपलाइनला गळती लागल्याचे आढळले. पाइपलाइनमधून सुरू असलेला पेट्रोलचा पुरवठा थांबवण्यात येत यंत्रणा सतर्क करण्यात आल्या. तत्काळ धोक्याचे सायरन वाजवण्यात आले. पथके घटनास्थळी दाखल झाली. १८ मिनिटात जीव धोक्यात घालत सुरुवातीस आगीचा भडका उडाला. पाइपलाइनवर फोम व नंतर मनमाड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने पाण्याचे फवारे सोडले.

इंडियन ऑइलचे वरिष्ठ अधिकारी, सुरक्षारक्षक रेस्क्यू टीम, ऑक्झिलरी टीम, फायर कॉम्बॅक्ट टीम, मनमाड पालिका अग्निशमन पथक, वैद्यकीय पथक सहभागी झाले होते. इंडियन ऑइल कंपनीचे टर्मिनल जनरल मॅनेजर आनंद बर्मन, सहव्यवस्थापक अनिल मेश्राम, कंपनीचे मुख्य प्रबंधक शिरीष राव, बीपीसीएलचे अधिकारी जी. राजशेखर, हर्षिद सकट, एचपीसीएलचे किरण मेहेत्रे, तलाठी राहुल बिडगर, देवीदास निकम, डॉ. सुशांत तुसे आदी उपस्थित होते.

# माजी मंत्री धनंजय मुंडेंचा पाय आणखी खोलात

## आमदार सुरेश धस ईडीकडे तक्रार करणार

■ **महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई , दि. ८ :** माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कृषी विभागातून धनंजय मुंडे यांनी २०० कोटी रुपये उचलले असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी केला आहे. या संदर्भात आपण ईडीला पत्र पाठवणार असल्याचे सुरेश धस यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे कृषी मंत्री असताना कृषी विभागात पिक विमा योजनेत घोटाळा झाला असल्याचा दावा याआधी देखील त्यांनी केला होता. कृषी विभागात शेतकऱ्यांच्या पिक विमा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. या संदर्भात मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी कृषी विभागाचे २०० कोटी रुपये उचलले असल्याचा आरोप धस यांनी केला आहे. या संदर्भातले काही कागदपत्रे त्यांनी या आधी राज्य सरकारकडे देखील सादर केले होते. त्यानंतर आता हे सर्व पुरावे सुरेश धस हे ईडी कार्यालयात देणार आहेत.



# वाल्मीक कराडच्या बीडमध्ये अनेक टोळ्या

## गोपनीय साक्षीदाराचा पोलिसांत जबाब

■ **महासागर प्रतिनिधी,**

**बीड , दि. ८ :** बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याकांडात वाल्मीक कराड हाच या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचे सिद्ध करण्यासाठी ५ गोपनीय साक्षीदारांचे जबाब महत्त्वाचे ठरलेत. या साक्षीदारांच्या जबाबातून बीडमध्ये वाल्मीक कराड, विष्णू चाटे व सुदर्शन घुले यांच्या टोळीची असणारी प्रचंड दहशत अधोरेखित झाले आहे. विशेषतः वाल्मीक कराडची एक नव्हे तर अनेक टोळ्या असल्याचेही यातून स्पष्ट झाले आहे.



सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरणानंतर निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हत्येशी संबंधित खंडणी प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. पण आता या खंडणीसाठीच देशमुखांचा खून झाल्याचा दावा या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने केला आहे. त्यांनी तसे आरोपपत्रही न्यायालयात दाखल केले आहे. या पार्श्वभूमीवर या प्रकरणातील गोपनीय साक्षीदारांनी केलेले दावे समोर आले आहेत.

सुदर्शन घुलेच्या टोळीची प्रचंड दहशत पाच पैकी एका गोपनीय साक्षीदाराने आपल्या जबाबात म्हटले आहे की, सुदर्शन घुले, प्रतीक घुले व सुधीर सांगळे हे माझ्याच गावचे आहेत. मी त्यांना चांगले ओळखतो. प्रतीक घुले हा रिक्षा चालवत असे, तर सुधीर सांगळे याचे गंगामाऊली साखर कारखाना परिसरात हॉटेल आहे. सुदर्शन घुले या कारखान्यावर मुकादम म्हणून काम करत होता. प्रतीक घुले व सुधीर सांगळे हे दोघेही त्याला भाऊ मानत. ते त्याला भावा म्हणून हाक मारायचे. या तिघांची गावासह परिसरात प्रचंड दहशत आहे. या तिघेही वाल्मीक कराडच्या निर्देशांनुसार खंडणी गोळा करण्याचे काम करतात. माझा हा जबाब संगणकावर टाईप करण्यात आला आहे. तो बरोबर व खरा आहे.

### वाल्मीक कराडच्या एक नाही अनेक टोळ्या

दुसऱ्या एका साक्षीदाराने वाल्मीक कराडच्या सुटकेसाठी सुदर्शन घुलेच्या टोळीतील लोकांनीच आंदोलन केल्याचा दावाही केला आहे. तो म्हणाला, वाल्मीक कराडने जिल्ह्यात आपले वर्चस्व राखण्यासाठी अनेक टोळ्या तयार केल्यात. याच टोळ्यांच्या माध्यमातून तो अनेक कंपन्यांकडे खंडणी मागतो. तसेच खंडणी मिळाली नाही तर तो कंपनी बंद पाडतो. एवढेच नाही तर खंडणीत अडथळा निर्माण करणाऱ्याला हे मारहाण करण्यासही कमी करत नाहीत. याच दहशतीमुळे वाल्मीक कराडविरोधात कुणी गुन्हा दाखल करत नाही.

**विशेषतः** कुणी हिंमत दाखवून तक्रार दाखल करण्यास गेले तर त्याची तक्रारही दाखल करून घेतली जात नाही. वाल्मीक कराडला अटक केल्यानंतर बीडमध्ये ठिकठिकाणी आंदोलन झाले होते. हे आंदोलन त्याच्याच टोळीतील लोकांनी केले होते, असेही या साक्षीदाराने आपल्या जबाबात म्हटले आहे.

## पतंगराव नव्हे रॉकेटराव !

**म**हाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज७ वी पुण्यतिथी. ७ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ४मार्च २०१८रोजी त्यांचे निधन झाले. ८जानेवारी १४४४रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग. पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १४६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे. भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १४६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १४८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १४४० सालच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १४४५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते. काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशष्ट्य होते. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उदघाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ४ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**४४२२५४६२४५**

# भाजप आमदार गोपीनाथ पडळकर यांची टीका, जयंत पाटील म्हणजे सराईत दरोडेखोर

■ **महासागर प्रतिनिधी,**

**सांगली , दि. ८ :** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यावर तिखट हल्ला चढवला आहे. जयंत पाटील हे सराईत दरोडेखोर आहेत. ते दरोडा टाकून आपल्या मागे कोणताही पुरावा ठेवत नाहीत. परदेशात शिक्षण घेतल्यामुळे त्यांनी फॉरेन रिटर्न असे वातावरण तयार केले आहे, असे त्यांनी म्हटले आहे. गोपीचंद पडळकर यांनी सांगली जिल्हा सहकारी बँकेतील कथित आर्थिक गैरव्यवहारावरून जयंत पाटील यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. ते म्हणाले, सांगली जिल्हा सहकारी बँकेची पूर्वीपासूनच चौकशी सुरू आहे. सहकारी अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत या प्रकरणी २२ मुद्यांवर चौकशी झाली आहे. त्याच्या चौकशी अहवालात जिल्हा बँकेवर ठपका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणी संचालक मंडळावर कारवाई करून बँकेवर प्रशासन नेमण्यात यावा. जिल्हा बँकेच्या माध्यमातून जयंत पाटील यांची सुरू असलेली मनमानी संपुष्टात आणण्याची मागणी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

जयंत पाटील या बँकेचे सर्वेसर्वा आहेत. ते सर्वकाही करतात. पण आपल्या त्याच्याशी काही संबंध नाही असे ते दाखवतात. ते एकाद्या सराईत दरोडेखोरालाही लाजवतील. काही लोक आपल्याकडे चोऱ्यामाऱ्या करायला येतात. ते आपल्या कृत्याचे कोणतेही पुरावे ठेवत नाहीत. जयंत पाटील हे त्यापैकी एक आहेत. ते ही आपल्या मागे कोणता पुरावा ठेवत नाहीत.



गोपीचंद पडळकर पुढे म्हणाले, जयंत पाटील हे केवळ गोड गोड बोलतात. दिसायला स्मार्ट आहेत. परदेशात शिकून आलेत. त्यामुळे त्यांनी फॉरेन रिटर्न असे वातावरण तयार केले आहे. त्यांच्या तोंडातून साखर पडते की काय? असे ते बोलतात. पण प्रत्यक्षात तसे नाही. सांगली जिल्हा सहकारी बँकेतील भ्रष्टाचाराचे मूळ हे जयंत पाटील आहेत. ते इकडे अंधारात भाजपच्या पाया पडत फिरत असतात. उल्लेखनीय बाब म्हणजे गोपीनाथ पडळकर यांनी गेल्याच महिन्यात जयंत पाटील यांचा टप्प्यात आणून कार्यक्रम करण्याचा इशारा दिला होता. ते म्हणाले होते, जयंत पाटील हे कपटी आहेत. ते

# सोशल मिडीयावर पोलीसांची करडी नजर

## सायबर सेल, अकोला कडुन सायबर पेट्रोलिंग करुन ४१ आक्षेपार्ह पोस्ट डिलीट !

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी): आजच्या युगात इंटरनेट हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. दैनंदिन जीवनातले बरेच व्यवहार आजकाल इंटरनेटच्या माध्यमातून पार पाडले जातात.

जसे की आर्थिक व्यवहार, बँकिंग, व्यावसायिक, शैक्षणिक, वैद्यकीय व जनसंपर्क इत्यादी. इंटरनेटच्या माध्यमाने मानवी जीवन सुलभ झाले आहे हे जितके खरे तितकेच याच्या वापराबाबतच्या अपुऱ्या माहितीने ते धोक्यातही आले आहे. त्यामुळे इंटरनेटचा वापर सुरक्षितरित्या करणे हि काळाची गरज आहे.

त्याचबरोबर सोशल मिडीयाचा वाढता वापर लक्षात घेता नागरिकांनी, विद्यार्थी वर्गाने, युवा पिढीने सोशल मिडीयाचा चांगला वापर करावा तसेच सत्यता न पडताळता कोणत्याही पोस्ट, फोटोज, व्हिडीओ इतरत्र शेअर करू नये.सायबर सेलने गेल्या वर्षभरात सोशल मिडीयावर मॉनिटरींग करून सोशल मिडीया प्लॅटफॉमवरील फेसबुक ०४, व्टिटर - ३२, इंस्टाग्राम - ४९ अशा एकुण ८५ आक्षेपार्ह पोस्ट शोधण्यात आल्या त्यापैकी ४१ आक्षेपार्ह




पोस्ट डिलीट करण्यात आल्या. तसेच त्याममध्ये धार्मिक भावना दुखावणाऱ्या, जातीय तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट, राजकीय आक्षेपार्ह पोस्ट, गुंडगिरी करणारे रिल्स, ३०२, ३०७, भाई, भाईगिरी, हातात तलवार, पिस्तुल, शस्त्र घेवुन रिल्सचा समावेश होता.

समाज माध्यमात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने तसेच सोशल मिडीयावर प्रसिध्दी मिळविण्यासाठी सोशल मिडीयावर काही तरुण वर्ग, विद्यार्थी हे हातात तलवार, पिस्तुल, शस्त्र घेवुन रिल्स बनवुन सोशल मिडीयावर पोस्ट करतात अशा पोस्ट करणाऱ्या ०४ जणांविरुध्द अकोला पोलीसांनी कायदेशीर कारवाई

करत संबंधीतांना समज देवुन त्यांचेकडुन व्हिडीओ डिलीट करण्यात आले आहे.तरी अकोला जिल्हयाशी संबंधीत अशाप्रकारच्या आक्षेपार्ह पोस्ट नागरिकांना आढळुन आल्यास त्याबाबत अकोला पोलीसांच्या व्टिटर (@akolapolice), फेसबुक (@akolapolice), इंस्टाग्राम (@police_akola) या सोशल मिडीया प्लॅटफॉमवर पाठवण्यात याव्या.'तरी सोशल मिडीयाचा चांगला वापर करण्यात यावा. तसेच कोणाचीही भावणा दुखावल्या जाईल किंवा जाती-धर्मात तेढ निर्माण होईल अशाप्रकारचे पोस्ट, फोटो, व्हिडीओ सोशल मिडीयावर अपलोड करू नये.'

# मुलींनी सोशल मिडियाचा संयमित वापर करावा

## एमआयडीसी ठाणेदार वैशाली मुळे यांचे आवाहन

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी): घराबरोबर नोकरी करणाऱ्या महिलांचा वाढता कल आहे. ज्या महिलांना गृहिणी आपण म्हणतो त्या देखील गृहकर्तव्य दक्ष असतात. त्यांच्यामुळेच परिवार मोठा होतो. मुलांना संस्कार मिळतात. पण, काळाच्या ओघात महिला नोकरी करताना पण आगेकूच करत आहे.

त्या घरात आणि नोकरीत देखील पारंगत झाल्या असून महिला सर्वच बाबतीत आता सक्षम झाल्याचे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी.



वैष्णवी यांनी व्यक्त केले.महिला सक्षम आहे. घर ही सांभाळू शकतात त्याच बरोबर बाहेर नोकरी करतात. ज्या प्रमाणे महिला घर अत्यंत जबाबदारीने सांभाळतात त्या प्रमाणे त्या नोकरीतील प्रत्येक काम यशस्वीपणे पार पाडतात. नुसते घर सांभाळणं ही काही सोपी गोष्ट नाही. घरात बाकी पण विषय असतात. फायनान्शियल, आर्थिक बाबी, सगळं सांभाळून पुढे जावं लागतं.

आणि जे जे घर सांभाळून पुढे जाऊन नोकरी पण करतात त्यांचे कॉन्ट्रीब्युशन अधिक असते. समाजात महिलांचा वाढलेला सहभाग हा मोलाचा ठरत आहे. आयुष्यातसर्वांच्या प्रत्येकाच्या आईचे खुप मोठे योगदान असते. माझ्या जीवनात माझी आई हे प्रेरणास्त्रोत ठरली. माझ्या आईमुळेच मी प्रशासकीय अधिकारी झाली. जिल्हा परिषद म्हणजे एक परिवार आहे. या परिवारात मी कुटूंब प्रमुख असून इतर ही अनेक महिला या यशस्वीपणे नोकरी आणि घर दोन्ही सांभाळत आहे.

# द म्युझिक थेरपीस्ट द्वारा गीतांचा रंगारंग कार्यक्रम



■अकोला,दि ८ (प्रतिनिधी): महानगरातील वैद्यकीय वर्ग आजारी व्यक्तींना आजारातून बरं करण्याचं काम करतात. या वैद्यकीय वर्गाने सेवेच्या व्यस्ततेतून स्वतःचा छंद जोपासण्यासाठी 'द म्युझिक थेरपीस्ट' हा संगीत प्रेमींचा समूह तयार केला हे. हा वैद्यकीय वर्ग गत वर्षांपासून 'कराओके' संगीताच्या माध्यमातून विविध गाणी गावून आपल्या छंद व कलागुणांना उजाळा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांचा हा कलाविष्कार आता प्रेक्षकांना ऐकावयास मिळणार मिळणार आहे.

रविवार दि ९ मार्च रोजी साय ६ वाजता प्रमिला ताई ओक हॉल मध्ये या वैद्यकीय वर्गाचा 'मिले सुर मेरा तुम्हारा 'हा विविध गीतांचा मोफत रंगारंग कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात डॉ. उज्वल कराळे, डॉ. उज्वल डॉ. संजय पाटील, डॉ.वांगे, हरीश कदम, डॉ. राजेशदेशमुख, डॉ. अमोल शहा, डॉ. चैतन्य बालानी, डॉ. मोहन वाकोडे, डॉ. प्रवीण अग्रवाल, डॉ. दिपाली बांगडीया, डॉ. प्रिया मायी, डॉ वर्षा राव, डॉ. शितल वांगे,डॉ. तुळसकर, डॉ. कीती सपना राजपूत आदी बहारदार गीते सादर करणार आहेत. महानगरातील महिला पुरुष प्रेक्षकांनी या सर्वांसाठी मोफत असणाऱ्या कार्यक्रमात उपस्थित राहून वैद्यकीय वर्गाचा आनंद द्विगुणित करावा असे आवाहन म्युझिक थेरपीस्ट'च्या वतीने करण्यात आले आहे.

# दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे कर्तव्यदक्ष महिलांचा सन्मान करुन महिला दिन संपन्न

**अकोला** : स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबवले जात आहेत. महिला सक्षमीकरणासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे ८ मार्च २०२५ रोजी अकोल्यातील कर्तव्यदक्ष महिलांचा सन्मान करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. सदर सामाजिक उपक्रमात कर्तव्यदक्ष पोलीस शिपाई, दिव्यांग महिला, डॉक्टर्स , परिचारिका व छोट्या उद्योजिका महिला यांचा संस्थेतर्फे गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या उपक्रमात दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे संस्थापक



अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे यांनी महिलांना त्यांच्या प्रश्नांबद्दल विचारणा केली. दिव्यांग महिलांच्या समस्या जाणून त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी विशेष मार्गदर्शन त्यांनी केले.दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे आयोजित जागतिक महिला दिनाच्या या सामाजिक उपक्रमाला सर्व महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला व संस्थेचे आभार व्यक्त केले. सदर सामाजिक उपक्रमात अस्मिता मिश्रा , तन्वी दळवे , अनामिका देशपांडे, विजय कोरडे, डॉक.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्क चे दिया पाटील ,पूजा गवई, मयुरी रणवीर, अतुल डोंगरे व सुजल सावांग या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# संस्कार पब्लिक स्कूलमध्ये महिला दिनाचे आयोजन


## शिक्षिका व शालेय कर्मचारी यांचा भेटवस्तू देऊन सन्मान

**अकोला** : स्थानिक जुने शहर गणेश नगर स्थित संस्कार पब्लिक स्कूलमध्ये महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ह्या वेळी शाळेचे मुख्याध्यापिका सौ अर्चना ठोसर यांचे हस्ते सरस्वती पूजन करून पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन शाळेच्या शिक्षिका आणि ताईना सन्मानित केले.बहुतांशी शिक्षिका ह्या शाळेच्या सुरुवातीपासून कार्यरत असून विद्यार्थी व व्यवस्थापन यांचे सोबत एक जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आहे. निवडक शिक्षीकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शाळेच्या महिला पालक वर्ग सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. ह्या वेळी शाळेच्या शिक्षिका वर्षा



जोगळेकर, निता सोनीने, राधा पांचभाई कांचन चिंतामणी, बरखा श्रीबते, शीतल सरप, प्रतीक्षा देशमुख, अश्विनी गावंडे, दीप्ती पाली, रिंकू चावरे तसेच शाळेचे सर्व ताई सारिका ताई, मेघा ताई, प्रिया ताई, वर्षा ताई, संगीता ताई, ह्यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मातृशक्तीचा सन्मान



**अकोला** :जागतिक महिला दिनानिमित्त राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या माता भगिनिंना शाल व स्मृतिचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून सागर कावरे व मित्र परिवाराच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त जवाहर नगर येथे मातृशक्ती सन्मान सोहळा मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात येत असतो यावर्षी काही कारणास्तव सदर कार्यक्रम होवू शकला नाही परंतु कार्यक्रमात खंड न पडू देता यावर्षी सुध्हा राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या,प्लास्टिकमुक्त अकोला साठी अतोनात प्रयत्न करणाऱ्या डॉ.मनीषा पालीवाल, सुगरणीज किचन च्यामध्यमातून अतिशय कमी दिवसांमध्ये यशस्वीरित्या व्यवसायिक क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करणाऱ्यासौ.अंजली अतकरे,सौ प्रांजली हरकरे सौ अनघा दीक्षितश्रीमती आशा मानकर तसेच शैक्षणिक क्षेत्रात कुठलेही पार्श्वभूमी नसतांना स्वतःच विश्व निर्माण करणाऱ्या सिम किड्स च्या संचालिका कोमल देशमुख यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. आपण करीत असलेला सन्मान हा त्या महिलांना प्रोत्साहित करणारा व इतर महिलांना प्रेरणा देणारा असतो,त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येतं असते असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सागर कावरे,कपिल रावदेव,अंशुमन देशमुख,सौ.पुष्पा देशमुख, विलास काळे,सुजय ढोरे,विराज डिक्कर,दत्ता देशमुख,दिनेश लोहोकार,अंकुश भेंडेकर,भूषण चतरकर,पौर्णिमा देशमुख, अश्विनी देशमुख,डॉ. छाया देशमुख,गौरव मुराळे,प्रदीप मोहोड आदी उपस्थित होते.

# बिझनेस क्लबने केला शेकडो मातृशक्तीचा सन्मान

## जेष्ठ कथक नृत्यांगना राधिका साठे यांना जीवन गौरव पुरस्कार

**अकोला** : उद्योग,व्यापार समवेत सामाजिक सेवा कार्यात ही सक्रिय असणाऱ्या यंग इंडिया बिझनेस क्लबने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पुर्वसंध्येवर समाजातील सर्व घटकांमधील स्वावलंबी आणि स्वतःचे जग निर्माण करणाऱ्या शेकडो कर्तबगार मातृशक्तीचा सन्मान केला.स्थानीय माहेश्वरी भवनात संपन्न या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय रेल्वे व्यवस्थापक भुसावळ इती पांडे, मिसेस इंडियाच्या विजेत्या रूपल मोहता,समाजसेवी आशालता सोनालावाला,क्लबचेव्यवस्थापकीय संचालक ॲड. देवेंद्र अग्रवाल व चेअरमन रमाकांत खेतान आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या स्वागताने या सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला.मान्यवरांनी यावेळी उद्योग, व्यवसाय,शासकीय व खाजगी सेवा, संस्कृती, समाज, धर्म,वैद्यक,शिक्षण,कला,क्रीडा इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेकडो मातृशक्तीना मोमेंटो देऊन सन्मानित करण्यात आले.या पुरस्कारात सन्मान रत्न,पुरस्कार रत्न




व सहयोग रत्न अश्या श्रेणी होत्या.यात ड्रायव्हर पोलीस,भाजी विक्रेत्या, कामगार,मोलकरीण, पंचर काढणाऱ्या, व्यवसायिक, औद्योगिक, शिक्षिका, संस्कृती व समाजसेवेत सहभागी असलेल्या महिलांचा समावेश होता.यावेळी जीवन गौरव पुरस्कार राष्ट्रीय कथक नृत्यांगना राधिका साठे यांना प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमात महिला प्रतिभा प्रदर्शन,नृत्य, मिमिक्री, वेशभूषा इत्यादी कार्यक्रम सादर करण्यात आलेत.त्यात डॉ विनिता माहेश्वरी, तेजरूप कुलकर्णी, सौ अर्चना शर्मा आदींनी आशा खोकले यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमात महिला प्रतिभा प्रदर्शन,नृत्य, मिमिक्री, वेशभूषा इत्यादी कार्यक्रम सादर करण्यात आलेत.

# कर्तृत्ववान महिलांचा जागेश्वर सेवा समितीने केला साळीचोळी देऊन सन्मान!

**बाळापूर** : तालुक्यातील बोरगाव वैराळे येथील श्री जागेश्वर सेवा समितीने परिसरातील भाविकांना घेऊन गंगासागर व जगन्नाथ पुरी येथे देवदर्शनाला गेले असता दि ८ मार्च २५ ला जागतिक महिला दिनी सोबत असलेल्या व विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उम्टविनाऱ्या कर्तृत्वान महिलांचा जगन्नाथ पुरी येथे साळीचोळी देऊन सन्मान केला या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे भाविक महिलांनी कौतुक केले यावेळी बोरगाव वैराळे च्या महिला सरपंच कल्पना वैराळे व कोथळी अर्बन पत संस्था अध्यक्ष ठोंबरे ताई यांच्या हस्ते महिलांचा सन्मान करण्यात आला



या कार्यक्रमाला उपसरपंच राजेश्वर वैराळे, सामाजिक कार्यकर्ते विनायक वैराळे, हभप गणेश महाराज साठे, गजानन महाराज रोडे, निलेश महाराज बांगर, राधेश्याम महाराज राऊत, दत्ता सुरतकर, माणिकराव वैराळे, माधव वैराळे,रामजी घाटे,पुरुषोत्तम शेळके, सुनील गावन्डे, नीलकंठ वैराळे, बाळकृष्ण बोर्डे, सुशीला साठे, गीता वैराळे, विद्या शेळके, गोकुळा शेळके, ज्ञानेश्वर शेळके, अनंत शेळके, केसर वैराळे, सुशीला वैराळे,सरला वैराळे, रंजना मानकर,अलका गावन्डे,उषा मानकर,सुकेशिनी बोर्डे,आदिसह बहुसंख्य महिला उपस्थित होत्या

# मनपात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कँसर रोग तपासणी शिबीराचे आयोजन





**अकोला** : अकोला महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये व मनपा उपायुक्त गीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आज दि. ८ मार्च २०२५ रोजी मनपा वैद्यकीय आरोग्य विभाग आणि मनपा समाज कल्याण व विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा अधिनस्त असलेल्या महिला अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडून आलेल्या मोबाईल कँसर स्क्रिनिंग व्हॅनच्या माध्यमातून कँसर रोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.मनपा प्रशासनाव्दारा आयोजित जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात सर्वप्रथम मनपा आयुक्त डॉ.लहाने व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फ्फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर मनपा आयुक्त डॉ.लहाने, उपायुक्त गीता ठाकरे आणि धनश्री पवार यांनी उपस्थित अधिकारी कर्मचा-यांना जागतिक महिला दिनाचे महत्व सांगितले आणि मनपा अधिकारी/कर्मचा-यांसह शहरातील समस्त नागरिकांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तदनंतर मनपा आयुक्त डॉ.लहाने यांच्या हस्ते मोबाईल कँसर स्क्रिनिंग व्हॅनची फीत कापून शिबीराला सुरुवात करण्यात आली. या शिबीरच्या माध्यमातून मनपा महिला अधिकारी/कर्मचारी यांचेसह मनपात नोंदणीकृत असलेल्या महिला बचत गटाच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. तसेच यावेळी मनपा अधिकारी/कर्मचा-यांच्या वतीने जितेंद्र तिवारी यांनी मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि धनश्री पवार यांचा पुष्प गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या शिबरामध्ये डॉ.दिपाली काळे, स्त्री रोग तज्ञ, डॉ.तेजल ढेंगे, दंत रोग तज्ञ, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमृता फोकमारे, डॉ.रुची पहुरकर, अंकुश धोड, साजिदोद्दीन, मुदस्सिर खान, आभा जाधव, स्वाती डांगे, शारदा साबळे, मेश्राम सिस्टर, शीतल वानखडे, वाघोडे, रिझवान अली किदवई, रेश्मा कुरिल यांनी सेवा दिली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.आशिष गि-हे यांनी केले, कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ.नितिन गायकवाड यांनी केले. यावेळी शहर प्रकल्प अधिकारी गणेश बिल्लेवार, संजय राजनकर, प्रमोद गायकवाड, समाज कल्याण व विकास विभागाचे देवेंद्र भोजने, डॉ.अनुप चौधरी यांचेसह ईतर अधिकारी कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# कोष्टी समाज परिषदच्या वतीने महिला सत्कार समारंभाचे आयोजन

**अकोला** : दिनांक १६ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. या सोहळ्याला कोष्टी समाजाचे धर्मगुरू श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामी महाराज (कर्नाटक) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.यावेळी विविध क्षेत्रांतील महिलांचा गौरव करण्यात येणार असून, यवतमाळ येथील सौ. मीनाताई संजय भड यांचा विशेष सन्मान केला जाणार आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिल्याबद्दल आणि समाजात एक आदर्श निर्माण केल्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले यांचा वारसा जपत सौ. मीनाताई यांनी आपल्या मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि समाजात आदर्श



निर्माण केला. त्यांच्या या संघर्षमय प्रवासाची दखल घेत अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेने त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आहे.सदर कार्यक्रम निधी मंगल कार्यालय दारव्हा येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.या समारंभाबाबत माहिती देताना प्रदेशाध्यक्ष सतीश दाभाडे म्हणाले की, परिस्थितीशी संघर्ष करून आपल्या कुटुंबाची प्रगती साधणाऱ्या स्त्रीशक्तीला समाजाच्या मुख्य प्रवाहात मानाचे स्थान देणे गरजेचे आहे.

# 'चिल्लर' माणसांचे 'भयानक' उद्योग!

महाराष्ट्रातील 'चिल्लर' माणसांचे 'भयानक' उद्योग पाहिल्यानंतर सर्वसामान्य माणूस हाबकून जातो. महाराष्ट्रात असे अनेक चिल्लर राजकीय नेते आहेत की ज्यांनी केलेले उद्योग हे अतिशय ताकदवान ठरले गेले आहे. महाराष्ट्रातील एका मंत्र्याने दिलेला 'नैतिकतेला' धरून दिलेला राजीनामा हा तसा 'चिल्लर'च समजावा लागेल.? छत्रपती शिवरायांचा अपमान करणारा आणि ज्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'चिल्लर' म्हणून संबोधतात, त्याचा इतिहास राज्याच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचला आहे. या चिल्लर माणसाचे संबंध बघितल्यावर कळाले की, तो किती ताकदवान आहे. खादीपासून सुरू झालेला 'चिल्लर माणूस' खाकी खिश्यात घेऊन फिरतो, अशी अनेक छायाचित्रे समाज माध्यमांवर फिरू लागली आहे. डॉ प्रशांत कोरटकर सारखी अनेक 'चिल्लर माणसं' या महाराष्ट्राने पोसली. यापूर्वी 'राज्यपाल' पदावर 'भाज्यपाल' म्हणून काम करणारा व काळ्या टोपीखाली सडका मेंदू असलेल्या भगतसिंग कोश्यारी या म्हाताऱ्याने देखील महाराष्ट्रातील दैवतांचा नेहमी अपमान केला. त्याचेच वारसदार म्हणून कोरटकर नावाचा सैतान ज्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'चिल्लर' म्हणून सांभाळतात. त्याची ताकद महाराष्ट्राच्याही लक्षात आली. रोल्सराईल्स गाडीत फिरणा?या या 'चिल्लर' माणसाचा संपर्क भाजपच्या केंद्रीय नेतृत्वापासून वेगवेगळ्या लोकांपर्यंत आहे. छत्रपती शिवाजी महाराज असो, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असो किंवा महात्मा ज्योतिबा फुले अथवा सावित्रीबाई फुले असो यांची एवढी ॲलर्जी असलेली माणसं महाराष्ट्राने का पोसावी? अशावेळी भाजपचे इतर बोलघेवडे व 'नवहिंदुत्ववादी' पोपट सुद्धा 'मिठू मिठू' करण्याऐवजी गायब होतात. मराठी, महाराष्ट्राची अस्मिता सोडून कीती लाचारी स्वीकारावी हा महत्वाचा प्रश्न आता निर्माण होत आहे. मराठी अन् महाराष्ट्राचा अवमान करणा-या आरएसएसवाल्या भय्या जोशी यांचे विधान ऐकल्यावर तर डोक्याला हात लावायची वेळ आली. एरव्ही छुटपुट गोष्टी ऐकणारे अन् त्यावर बेंबीच्या देठापासून ओरडून मत मांडणाऱ्यांच्या कानांना महाराष्ट्राच्या अस्मितेच्या विषयावर बहिरेपणा येतो का?







अतिशय बेजबाबदारपणे एखाद्या जबाबदार व्यक्तीने एखादे विधान केले, तर त्याची दखल घ्यावी लागते. पण अशा जबाबदार व्यक्तीला प्रशांत कोरटकरला राज्याचे मुख्यमंत्री जर 'चिल्लर' माणूस म्हणून दुर्लक्षित करीत असेल, तर ती बाब गंभीरच समजावी लागेल.

साधु संताची परंपरा अभिमानाने सांगणाऱ्या तसेच स्वाभिमान शिकवणाऱ्या छत्रपती शिवरायांपासुन सामाजिक अभिसरण घडवून आणणाऱ्या राजश्री शाहु महाराजाची उज्वल परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रात प्रशांत कोरटकर याच्यासारखी अघोरी विकृती का जन्माला आली असेल? सर्व जाती धमार्तील संताना त्यांच्या अभंगासह स्विकार करणारा पुरोगामी महाराष्ट्रामध्ये समाजमन थिजले काय? आता पर्यंत यांना पाठीशी घालणारे राजकारणी आपण हैवानाला पोसतो आहोत, याचे भान का आले नसेल? पैशातून सत्ता व पुन्हा सत्तेतून पैसा हेच गणित समोर ठेवून हवा तसा नंगानाच करणाऱ्या पांढरे शुभ्र बगळ्याच्या माना झुकतील काय?

हे अपयश संस्काराचे, शिक्षण व्यवस्थेचे आहे की शिक्षकाला देखील मुजरा करायला लावणाऱ्या शिक्षण सम्राटाचे? दोन नंबर धंद्याला एक नंबरचा राजाश्रय देणाऱ्या सत्तापिपासु गोचीड संपूर्ण व्यवस्था कोल मडल्यावर जागी होणार काय? देवेंद्र फडणवीसांनी गृहमंत्री या नात्याने संतोष देशमुख हत्याकांडावरील चर्चा टाळण्यासाठी औरंगजेबाचा गाडलेला मुडदा उकरुन अबू आझमीच्या बोकांडी देऊन विधीमंडळात आणला आणि अपेक्षित चर्चा घडवून आणण्याऐवजी अबू आझमीच्या निलंबनाच्या प्रस्तावावर चर्चा फिरवत ठेवली.

पण हे करत असतानाच आक्रस्ताळेपणा करुन संघाच्या शिकवणुकीनुसार येथेही काही कारण नसताना पंडित नेहरुंचा विषय काढून त्यांच्या धिक्काराची मागणी केली. काय तर म्हणे की पंडित नेहरुंनी त्यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी केली.

आता पंडित नेहरूंनी त्यांच्या पुस्तकात काय लिहिले आहे ते पहायला समाजाला वेळ कुठे आहे? पंडित नेहरुंनी त्यांच्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी असे लिहिले आहे की, औरंगजेबाच्या साम्राज्याला कलह आणि बंडाचे ग्रहण लागले असताना तिकडे पश्चिम भारतात मराठ्यांची सत्ता वाढू लागली होती, स्वतःला एकसंध करू लागली होती.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

१६२७ साली जन्मलेले छत्रपती शिवाजी महाराज हे डोंगराळ भागातील काटक मावळ्यांचे गनिमी काव्याने लढणारे आदर्श नेते होते, त्यांच्या घोडदळाने खूप दूर जात सुरत शहर लुटले होते. त्या ठिकाणी इंग्रजांची वखार होती, तिथे जाऊन त्यांनी मुघलांच्या मालकीच्या दूरवरच्या भागातील लोकांना चौथाई कर द्यायला लावला. शिवाजी महाराज हे पुनरुत्थान झालेल्या हिंदू राष्ट्रवादाचे प्रतीक होते, त्यांना जुन्या महाकाव्यातून प्रेरणा मिळाली होती. ते अतिशय धाडसी असून त्यांच्याकडे उच्च दर्जाचे नेतृत्व गुण होते.

त्यांनी मराठी लोकांचा एक मजबूत आणि एकजूट झालेला असा लढवय्या गट तयार केला, त्यास राष्ट्रवादी पार्श्वभूमी दिली आणि त्यांचे रूपांतर अशा एका उग्र शक्तीत केले, जिने मुघल साम्राज्याला मोडून टाकले. शिवाजी महाराज १६८० साली वारले, परंतु मराठी सत्ता वाढतच राहिली आणि तिने भारतावर वर्चस्व गाजवले. आता यामध्ये शिवाजी महाराजांची बदनामी होईल असे काय लिहिले आहे? पण जनतेलाही खोलात जायला वेळ कुठे आहे?

आज महाराष्ट्रात समाज पुरुषांबद्दल अतिशय घाणेरड्या भाषेत बोलले जाते. एका बाजूला थोर समाज पुरुषांची बदनामी करायची तर दुसऱ्या बाजूला वाटेल त्याला मारून टाकायचे असे वातावरण व राजकारण तयार झाले आहे. संतोष देशमुख यांच्या झालेल्या क्रूर हत्येचे प्रकरणही तसेच आहे.

नुकतेच बीड जिल्ह्यातील सतीश भोसले हा संदीप ढाकणेला मारहाण करतानाचा जुना व्हिडिओ व्हायरल होत आहे. मार खाणारा वंजारी आणि मारणारा भोसले असल्यामुळे मराठ्यांवर टीका करून पोट भरणाऱ्या लक्ष्मण हाके आणि इतर ओबीसी नेत्यांना यात जातिवादाची संधी दिसली. त्यांनी बोंब ठोकायला सुरू केली. परंतु सतीश भोसले मराठा नाही हे समजताच या सर्व जातीवादी नेत्यांमध्ये स्मशान शांतता पसरली. त्यामुळे आता आपल्या महाराष्ट्रात हत्या कोणत्या जातीच्या माणसाची झाली व हत्या करणारा कोणत्या जातीचा आहे यावर राजकारण करायचे का? असा प्रश्न विचारला जात आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचा मृत्यू कसा झाला, हे इतिहासकारांनी आपल्याला सांगीतले आहे. पण त्यानंतर एवढा भयानक मृत्यू सुमारे चारशे वर्षानंतर मराठी मातीत, मराठी माणसांनी, मराठी माणसाचाच बीडमध्ये करावा याच्यासारखे दुर्दैव असूच शकत नाही. संपूर्ण महाराष्ट्र ते चित्र पाहतांना रडत होता. अनेकांची ते बघण्याची हिंमत झाली नाही.

जनतेचा आक्रोश असतांनाही सत्तेचा माज जनमत कसा लाथाडतो हे उभ्या महाराष्ट्राने पाहीले. या महाराष्ट्राने खैरलांजीचे भोतमांगे कुटुंबाचे आक्रोश असेच जिरवले होते.

न्याय मागून थकलेले भय्या भोतमांगे अखेर तसेच गेले. मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या होत्या की, 'धनंजय मुंडे यांचे पानही ज्यांच्या शिवाय हलत नाही ते वाल्मीक कराड '...आणि समोरची गर्दी टाळ्यांचा कडकडाट करते. इतका मोठा पुरावा जनतेच्या न्यायालयात बहिणीने दिल्यावर खरे तर त्या व्यक्तीला सह आरोपी करायला हवे होते. पण केवळ फक्त राजीनामा? त्या क्रौर्य आणि उलट्या काळजाच्या आरोपीला जो व्यक्ती पाठीशी घालतो त्याला शिक्षा फक्त मंत्री कार्यालयात न येणे इतकेच? ■ ■

### देवाची काठी मुंडेंच्या पाठी

मागे एका मुलाखतीत शरद पवार म्हणाले की, या धनंजय मुंडेंना कशा कशातून बाहेर काढलंय. पण 'धनंजय मुंडे' तयार करायला सगळे सर्वपक्षीय जबाबदार आहेत आणि महाराष्ट्रात असे जागोजागी 'धनंजय मुंडे' तयार करून ठेवलेत. तेव्हाच धनंजय मुंडेला वाचवलं नसतं तर आज संतोष देशमुख जिवंत असते. माझे हात-पाय तोडा रं. पण माझ्या मुलीसाठी आणि मुलासाठी मला जिवंत राहू द्या" पण तरीही या हैवानांना संतोषची दया आली नाही. मरतांना पाणी मागितल्यावर तोंडात मुतणाऱ्या औलादी महाराष्ट्रात जन्माला आल्याच कश्या? गिधाडं देखील प्राण्यांचे लचके तोडण्यापुर्वी प्राणी जिवंत नाही याची खात्री करतो. कसाई देखील प्राणी कापण्यापूर्वी त्याला पाणी पाजतो. या औलादी मुतल्या इथल्या मुर्दाड व्यवस्थेवर, इथल्या सत्तेसाठी लाचार, स्वार्थी राजकारण्यांवर, झापडबंद समाज व्यवस्थेवर, पुरोगामीत्वाचा बुरखा घालून जातिवादाची विष पेरणाऱ्या ढोंगी औलादींवर. पण आपण कोठपर्यंत नुसतं बघतच रहाणार? नाठाळाच्या माथी हाणु काठी म्हणणाऱ्या संत तुकारामाच्या महाराष्ट्रात खाकीच्या काठीला पुन्हा सन्मान कधी प्राप्त होणार? रक्त गोठलेल्या मानसिक विकृत वृत्तीचा नायनाट करण्यासाठी माणुसकी शिल्लक आणि जिवंत असेल तर लढाई लढण्यासाठी आता जनतेने एकत्र येण्याची गरज आहे. हे प्रकरण माध्यमांनी लावून धरले म्हणून बरे अन्यथा असेच दडपले गेले असते. अंजली दमानिया, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर, मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी सातत्याने हे प्रकरण लाऊन धरले. प्रसार माध्यमे, पत्रकारांनी हे प्रकरण बाहेर काढले नसते, तर हेच प्रकरण एक मर्डर म्हणून बाजूला गेले असते. एका विशिष्ट जातीच्या ताब्यात प्रशासन असल्यावर सामान्य जनतेला काय भोगावे लागते याचा परिपाठ म्हणजे बीड पॅटर्न म्हणावा लागेल. या टोळ्या पैसे कमवायच्या हव्यासापोटी कायदा, सुव्यवस्था, न्याय, माणुसकी, सत्ता या सगळयावर मुतली असेच म्हणावे लागेल.

### कोरटकरी, सोलापूरकरी गिधाडांना बळ नको

संतोष देशमुखला न्याय मिळवूनच द्यायचा असेल तर पहिल्यांदा जात दूर ठेवा. मिडीयामधून अचानक संतोषच्या मृत्यूचे व्हायरल झालेले फोटोज हे अनाजीपंती कपट असू शकतं. बळी पडू नका. आपण जातीजातीत लढलो तर जुल्मी सत्तेचा फास आणखी आवळला जाईल. कमकुवत पडत चाललेल्या कोरटकरी, सोलापूरकरी गिधाडांना बळ देण्यासाठी समाजात फुट पाडण्याचा कट असू शकतो. एवढंच लक्षात ठेऊया की, खून झालेला एक तुमच्या माझ्यासारखा माणूस होता आणि मारेकरी माजोरड्या सत्ताधाऱ्यांचा वरदहस्त असणारे आहेत. वर्तमानात आपल्या भवताली याच दोन जाती आहेत. सामान्य माणूस विरूद्ध सत्तेतले नराधम'. याच दोन जातीत सध्याचा संघर्ष सुरू आहे, हे मेंदूत कोरून घ्या. मेलेला मराठा विरुद्ध मारणारे वंजारी अशी कळ ठरवून लावली जात आहे. गुन्हेगारांच्या म्होरक्याला वाचवण्यासाठीचं ते कारस्थान आहे.

एक सत्य समजून घ्या की याच मारेकरी नराधमांनी याच बीडमध्ये अनेक वंजाऱ्यांचाही बळी घेतला आहे. म्हणजेच ते जातीच्या नाही, तर सत्तेच्या कैफात धुंद आहेत. या खुन्यांपासून ते कोरटकरांपर्यंत सगळे एका माळेतले मणी आहेत. त्यामुळं संतोष देशमुख प्रकरणात बोलताना मराठा-वंजारी अशा जातीवरून कमेंट करू नका. फक्त ज्या सत्ताधाऱ्यांच्या बळावर त्यांनी हे निर्घृण कृत्य केलं त्या सत्ताधाऱ्यांना टारगेट करा.

**किरण माने**

### आम्ही विसरणार नाहीत...

आवदा पवनचक्कीच्या गेटवर बौद्ध समाजाचं चहाचं हॉटेल होतं. गेटवर सोनवणे सारखे अनेक बौद्ध नोकरीला होते. मारेकरी तिथे आपली दहशत निर्माण करून सगळ्यांना हाकलून स्वतःचा कब्जा करू पाहत होते. सुदर्शन घुलेनी सोनावणेला मारलं आणि धावत गावातून सरपंचांने जाऊन, आमच्या गावातल्या लोकांना मारतो का? असं म्हणत दादागिरी हुकूमशाही विरोधात दंड थोपटले. बौद्ध समाजाच्या भूमिहीन तरुणांना तिथे कामाला लावलं आणि त्यांच्या रोजी रोटीवर पाय देण्यास निघालेल्यांना उत्तर देण्याची धमक दाखवली. मानवतेचं प्रतीक संतोष देशमुख त्याचा बंड जातीच्या पलीकडे होता. आज त्याचे फोटो पाहतोय, मन सुन्न झालं मानवतेसाठी बलिदान देणाऱ्या वाघाला सलाम! अनेक विद्धवान आपली वोटबँक जपण्यासाठी सामाजिक सलोखा उद्धवस्त करत असतात. संतोष देशमुख मराठा होता म्हणून त्यांनी तेल टाकून टाकून धनंजय मुंढेची पाठराखण केली. ज्या संतोष देशमुखने दलितांसाठी आपलं बलिदान दिलं त्याची कदर सुद्धा त्यांना आली नाही. जर दलित ऊसतोड मजूरांनी पैसे फेडले नाहीत तर असच त्यांना कुठूनही उचलून आणून हे मारायचे. ऊसतोड मजूर बहिणींचे शोषण करायचे. मी ऊसतोड मजूराचा पोरगा आहे, मला मुकादम आणि त्यांच्या गँगची दहशत मी जाणून आहे.

**दिपक केदार**

### राजीनामा नैतिकतेवर की तब्येतीच्या कारणावर?

शेवटी एकदाचा धनंजय मुंडेंचा राजीनामा झाला. नैतिकतेच्या आधारावर नाही तर तब्येतीच्या कारणावर. असा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी नामंजूर करायला हवा होता आणि त्यांना बडतर्फ करायला हवं होतं. आता राजीनामा झाला म्हणून काही मोठा फरक पडणार नाही. महाराष्ट्रात ही जी घाण पसरली आहे, ती सहजासहजी साफ होणार नाही. सरकार आपली सत्ता वाचवण्यात बिझी आहे, पोलीस गृहमंत्र्यांचे गुलाम बनण्यात धन्यता मानतात किंवा त्यांची अपरिहार्यता असेल. काहीही असो. करूणा मुंडेंची तडफड आपण बघत आहोत. तिचे समजू शकते. पण राजश्री मुंडेंचे काय? तिला हे सगळं कसं पचतंय? आपला नवरा काय करतोय तिला कळत नाही? ती असह्य आहे की तीही सत्तेच्या गुळाला चिटकण्यात धन्यता मानते? धन्य आहे ती पत्नी आणि धन्य तो नवरा. महाराष्ट्राच्या राजकारणाने न्यायालयांचीही लक्तरं वेशीवर मांडली. आयुष्यात गेल्या २-४ वर्षात पहिल्यांदा असे वाटते, की हा देश राहण्याच्या लायकीचा आहे का? हाच का तो महाराष्ट्र ज्यात माझा जन्म झाला आणि मी मोठी झाले? नाही नाही. हे आता सहन होत नाही. संतोष देशमुखच्या विदारक मृत्यूवर बोलायचे सोडून आमचे माजी मुख्यमंत्री आता विधानसभेत संभाजी राजांचा मृत्यू कसा झाला, त्याचे वर्णन करत आहेत. काय बोलावे? नको आहेत आम्हाला असे सरकार. नको हे मंत्री अन् मुख्यमंत्री. ही कीड लवकरात लवकर चिरडून मारली पाहिजे.

**प्रज्ञा सामंत**

## पायऱ्यांवरील आंदोलनाचा बिनडोक, प्रसिद्धीलोलुप तमाशा
# महाराष्ट्रात कधी बंद होणार?

महाराष्ट्राच्या विधिमंडळ पायऱ्यांवर होणारी आंदोलने हा काही नवीन प्रकार नाही. वर्षानुवर्षे विविध पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते इथे आंदोलने करताना दिसतात. परंतु, ही आंदोलने लोकशाहीच्या हितासाठी उठलेली लढाई नसून, ब?याचदा प्रसिद्धी मिळवण्याचा एक सोपा मार्ग ठरतात. अनेकदा हे आंदोलनकर्ते आमदार सभागृहात प्रश्न उपस्थित करण्याऐवजी, बाहेरच घोषणा देण्यात धन्यता मानतात. त्यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी केवळ माध्यमांमध्ये झळकण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट होतो.

**पायऱ्यांवरील आंदोलनांचा खरा उद्देश काय?**

काही वर्षांपूर्वीपर्यंत पायऱ्यांवरील आंदोलने ही सत्ताधारी सरकारला जाब विचारण्यासाठी वापरण्यात येत होती. परंतु आता, अनेकदा याचा उपयोग स्वतःला चमकवण्यासाठी होतो. अनेक लोकप्रतिनिधी किंवा विरोधी पक्षातील नेते, सभागृहात योग्य मार्गाने प्रश्न उपस्थित करण्याऐवजी, बाहेर येऊन घोषणाबाजी करतात. यामुळे खरे प्रश्न बाजूला राहतात आणि फक्त टीव्ही कॅमेऱ्यांसाठी नाट्य उभे राहते.

संसदीय लोकशाहीमध्ये सरकारला जाब विचारण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी विधिमंडळ आणि संसदेचे अधिवेशन आयोजित केले जाते. परंतु, जर विरोधक आणि सत्ताधारी सदस्य प्रत्यक्ष सभागृहात न बोलता फक्त बाहेर आंदोलन करत असतील, तर ही परिस्थिती चिंताजनक आहे.

**लोकप्रतिनिधींनी संसदीय पद्धतीने लढा द्यावा**

महाराष्ट्र विधानसभेतील किंवा विधानपरिषदेतील सदस्यांनी संसदीय आयुधे वापरून सरकारला जाब विचारला पाहिजे. सभागृहात चर्चेत भाग घेऊन, योग्य मुद्दे मांडून, प्रशासनावर दबाव टाकला पाहिजे. परंतु, त्याऐवजी जर सभागृहाच्या बाहेर नुसती घोषणाबाजी केली, तर त्याचा काही उपयोग नाही. लोकशाही ही रस्त्यावर घोषणा देऊन टिकत नाही, ती सभागृहात मुद्देसूद चर्चा करून अधिक बळकट होते.

विधानसभेत सध्या विरोधकांची संख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे त्यांचा आवाज सभागृहात दाबला जातोय, अशी त्यांची तक्रार असते. विरोधी पक्षनेत्यांना चर्चेसाठी पुरेसा वेळ दिला जात नाही, असे काही सदस्य सांगतात. त्यामुळेच ते सभागृहाबाहेर आंदोलन करून सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतात.

परंतु, या परिस्थितीला दुसरी बाजूही आहे. पायऱ्यांवर आंदोलन करणाऱ्यांमध्ये केवळ विरोधकच नाहीत, तर सत्ताधारी आमदार देखील मोठ्या प्रमाणात आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका करताना म्हटले होते की, उद्धव ठाकरे सभागृहात कमी आणि विधान मंडळाच्या आवारात अधिक दिसतात. त्यामुळे विरोधक आणि सत्ताधारी, दोघेही माध्यमांसमोर प्रसिद्धीसाठी या आंदोलनेचा वापर करत आहेत.

**इतर राज्यांत पायऱ्यांवरील आंदोलने का थांबली?**

भारतातील अनेक राज्यांनी आधीच अशा आंदोलनांवर बंदी घातली आहे. संसदेने देखील हे बाहेरचे ह्यतमाशेह्न पूर्णपणे थांबवले आहेत. संसदेच्या आवारात काहीही आंदोलन करायचे असेल, तर त्यासाठी ठरावीक जागा दिली जाते. त्यामुळे बिनधास्त आंदोलने करणाऱ्यांना सभागृहात यावेच लागते. महाराष्ट्रानेही हे धोरण अवलंबले तर नक्कीच हा दिखावूपणा कमी होईल.



दीपक कैतके

**माध्यमांची भूक आणि आंदोलनाचे नाटक**

आजच्या काळात माध्यमांमध्ये झळकण्यासाठी नेते काहीही करण्यास तयार असतात. सोशल मीडिया, वृत्तवाहिन्या आणि डिजिटल प्लॅटफॉर्म यामुळे व्हायरल होण्याची हौस वाढली आहे. त्यामुळेच अनेक लोकप्रतिनिधी मुद्दे मांडण्याऐवजी नाट्यमय पद्धतीने आंदोलने करतात. माध्यमेही या गोष्टींना प्रसिद्धी देतात, त्यामुळे हा प्रकार वाढतच चालला आहे.

पूर्वी आंदोलने केवळ ठोस मागण्यांसाठी होत असत, परंतु आता ती केवळ टीआरपी मिळवण्यासाठी होताना दिसतात. काही नेते आपल्या समर्थक आमदारांना जमवून, मोठमोठ्या घोषणा देऊन, कॅमेऱ्यासमोर नाट्यमय हावभाव करतात. या सर्व प्रकारांचा लोकशाही व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे.

**विधानसभा अध्यक्षांनी कडक भूमिका घ्यायला हवी**

महाराष्ट्र विधिमंडळाचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापतींनी या विषयावर ठोस निर्णय घ्यायला हवा. जर त्यांनी पायऱ्यांवरील तमाशाच्या प्रसारणावर बंदी घातली, तर अशा आंदोलनांची चमक आपोआप कमी होईल. माध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळत नाही, हे लक्षात आल्यानंतर नेते सभागृहात येऊन मुद्देसूद चर्चा करतील. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेचा दर्जाही उंचावेल.

संसदेत काही नियम आहेत, जसे की कोणत्याही सदस्याने सभागृहाच्या बाहेर आंदोलन करणे किंवा माध्यमांसमोर बिनबुडाचे आरोप करणे योग्य नाही. अशा नियमांची कडक अंमलबजावणी महाराष्ट्रातही झाली पाहिजे.

**पायऱ्यांवरील आंदोलनांची समाप्ती हवी!**

पायऱ्यांवरील आंदोलनांचा खरा हेतू जर जनतेच्या हिताचा असेल, तर ते सभागृहात उभे राहून मुद्दे मांडायला हवेत. बाहेर घोषणाबाजी करून फक्त प्रसिद्धी मिळवण्याच्या प्रयत्नांमुळे लोकशाहीला काहीच फायदा होत नाही. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने संसदेचे आणि इतर राज्यांचे अनुकरण करून पायऱ्यांवरील आंदोलनांवर बंदी घालायला हवी. अध्यक्षांनी ठाम भूमिका घेतल्यास हा बिनडोक, प्रसिद्धीलोलुप तमाशा कायमचा बंद होईल.

●●●●●

वाचक लिहितात

### थोर देशभक्तांचा अपमान थांबवा!

सध्या देशात थोर देशभक्त, क्रांतिकारी, शहीद, आणि धर्मवीरांच्या चारित्र्यावर टीका करण्याची स्पर्धाच सुरू आहे. नुकतेच अबू आझमी यांनी औरंगजेबा सारख्या क्रूर राजाला प्रतिभावान असे संबोधले. म्हणजेच धर्मवीर संभाजी राजे यांच्या अतुलनीय शौर्याचा आणि धर्मनिष्ठेचा अपमान केला. तसेच, काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी लोकसभेत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका करत मारी तरफ शहिदोंकी रांगे लगी थी । तुम्हारे सावरकर इंग्रजोंकी माफी मांग रहे थे' असे उन्मत्तपणे वक्तव्य केले. यातून त्यांचे इतिहासाचे अज्ञान दिसून येते.

अशी विधाने म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे चारित्र्यहनन करणेच आहे. स्वातंत्र्यलढ्यातील स्वा. सावरकरांचे योगदान अमूल्य आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे निर्वाण झाले. त्या वेळी श्रद्धांजली वाहतांना इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, देशभक्ती, शौर्य आणि स्वार्थ त्याग, साहस या गुणांचे दुसरे नाव म्हणजे सावरकर !

महात्मा गांधींनीही १९२१ साली स्वा. सावरकरांच्या सुटकेसाठी व्हाइसरॉयकडे विनंती करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे स्वा. सावरकरांचा सुटकेसाठी केलेला अर्ज "माफीनामा" होता असे म्हणणे हा इतिहासाचा विपर्यास आहे. आजच्या काँग्रेस नेत्यांनी इतिहासाचा अभ्यास करून मगच वक्तव्य करावीत. थोर देशभक्तांवर वारंवार वाचाळ टीका करण्याआधी सत्य जाणून घ्यावे. कुठल्याही देशभक्ताच्या चारित्र्यावर खोटे आरोप करणे हे पूर्वग्रहदूषितपणाचे लक्षण आहे आणि बुध्दीची दिवाळखोरी दर्शवत.

जनता आता हे खपवून घेणार नाही.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

## बदललेल्या हवामानामुळे पडलात आजारी?



अचानक हवामान बदलामुळे शरीरावर अनपेक्षित परिणाम होऊ शकतात. यामुळे सर्दी, ताप, खोकला आणि थकवा यांसारख्या विविध लक्षणांचा सामना करावा लागतो. ह्या समस्या केवळ एक प्रकारे होणाऱ्या आजारांसाठी कारणीभूत असू शकतात.


खोकला, नाकातील अडथळा, आणि ताप हे बहुतांश वेळा बदललेल्या हवामानामुळे होणारे सामान्य लक्षणे असू शकतात. वातावरणाच्या बदलामुळे शारीरिक थकवा, गडबड, आणि कमी एनर्जीही होऊ शकते. या सर्व लक्षणांची लवकरच तपासणी करून, योग्य उपाय करणं आवश्यक आहे.

ज्यावेळी हवामान बदलते, तेव्हा शरीराला आवश्यक असलेले पोषण वाढवण्याची आवश्यकता असते. त्यासाठी हायड्रेटेड राहा आणि भरपूर पाणी प्या. तसेच, ताज्या फळांचा आणि भाज्यांचा समावेश करा, ज्यामुळे तुमचे शरीर इन्फेक्शनपासून वाचू शकेल. प्रत्येक बदललेल्या वातावरणात शरीराला ताजेतवाने ठेवण्यासाठी नियमित व्यायाम महत्वाचा आहे. घरी आल्यावर, सार्वजनिक ठिकाणी असताना हात धुणे आवश्यक आहे. अंघोळ करतांना गार पाणी वापरणे टाळा, कारण थंड पाणी तुमच्या शरीराला ताण देईल. कोमट पाणी वापरल्यास, शरीराचे तापमान कायम राहील आणि इन्फेक्शनपासून बचाव होईल.

तुमच्या शरीराला व्हिटॅमिन डी मिळवण्यासाठी सूर्यप्रकाश आवश्यक आहे. जास्त वेळ घरात राहणे हे शरीरासाठी हानिकारक होऊ शकते. पहाटेच्या वेळी सूर्यप्रकाश घ्या, पण दुपारचे कडक ऊन टाळा. याशिवाय पुरेशी झोप घ्या. ●●●●

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### गुंडा राज

अरे, ही लोकशाही
आहे की ठोकशाही
जो तो मुद्द्याचं सोडून
गुद्दयावर येण्याची
करतोय घाई..

अब्जावधीचे घोटाळे
हे संगनमताने करतात
बिचारे मतदार निमुटपणे
टकमक पाहतात..

आम्हाला नव्हतं वाटलं एवढे
' हे 'असतील आतल्या गाठीचे
जनहीत बाजूला सारून
खिसे भरतील स्वतःचे..

## बिर्ला ओपस पेंट्सने लॉन्च केला
# एक आगळावेगळा पेंट स्टुडिओ



गुरुग्राम, ०६ मार्च २०२५, मुंबई: आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम उद्योगांतर्गत येणाऱ्या बिर्ला ओपस पेंट्सने आपल्या पहिल्या-वहिल्या बिर्ला ओपस पेंट स्टुडिओचे (कंपनीच्या मालकीचे आणि कंपनीद्वारा संचालित स्टोअर) आज उद्घाटन केले. या उद्योगातील हे अशा प्रकारचे पहिले एक्सपिरियंस सेंटर आहे. हे सेंटर ग्राहकांद्वारे रंगांचा शोध घेऊन त्यातून निवड करण्याची नवी प्रक्रिया सादर करेल. इनोव्हेशन, प्रीमियम ऑफरिंग्ज आणि खरोखर तल्लीन करणाऱ्या ग्राहक अनुभवाच्या माध्यमातून पेंट आणि सजावट उद्योगात मोठे परिवर्तन करण्याची या ब्रँडची वचनबद्धता या मोठ्या टप्प्यातून दिसून येते. आज गुरुग्राम येथे सुरू झालेल्या या सेंटरमध्ये १७०+ उत्पादने आहेत, त्यातून उपभोकत्यांना निवडीसाठी खास पर्याय मिळतात. कंपनीच्या विकास धोरणातील आणि देशभरात आपली रिटेल उपस्थिती वाढविण्याच्या दिशेने उचललेले हे एक लक्षणीय पाऊल आहे. अनुभवात्मक किरकोळ विक्रीवर ध्यान केंद्रित करून नवी दिल्ली, मुंबई, नवी मुंबई, बंगळूर, हैदराबाद, कोलकाता, लखनौ, जयपूर, अहमदाबाद आणि सुरत येथे आगामी महिन्यांत आणखी एक्सपिरियंस सेंटर्स उघडण्याची या कंपनीची योजना आहे. आणि त्यामागे देशातील दुसरा सर्वात मोठा डेकोरेटिव्ह पेंट्स ब्रँड बनण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे.

सदर लॉन्चविषयी बोलताना बिर्ला ओपस पेंट्सचे सीईओ श्री. रक्षित हरगवे म्हणाले, आज गुरुग्राम येथे आमच्या पहिल्या बिर्ला ओपस पेंट स्टुडिओचे उद्घाटन करून आम्ही भारत रंगांचा अनुभव कसा घेऊ शकेल हे ठरवण्यासाठी एक निर्णायक पाऊल उचलले आहे. भारतातील उपभोक्ते उत्पादने खरेदी करताना किंवा सेवा प्राप्त करताना नवे आणि अधिक सखोल पर्याय शोधण्यासाठी तयार आहेत. उपभोकत्यांच्या वर्तनातील हा बदल पारखून बिर्ला ओपस पेंट्समध्ये आम्ही काही सर्जनशील जागा उभ्या करत आहोत, ज्या घरमालकांना त्यांची कहाणी स्वतःच रेखाटण्यासाठी सक्षम करतील.

ते पुढे म्हणाले, हे एक्सपिरियंस सेंटर म्हणजे उत्कृष्टता, इनोव्हेशन बाबतची आमची वचनबद्धता, गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड न करण्याची वृत्ती आणि प्रत्येक घराला एक वैयक्तिक स्पर्श असला पाहिजे या आमच्या आग्रहाचे प्रतीक आहे. आमची सर्वच्या सर्व १७०+ उत्पादने आम्ही या सेंटरमध्ये ऑफर करत आहोत. शिवाय काही खास पर्याय देखील आहेत, ज्यामुळे ग्राहक अगदी नव्या पद्धतीने आमच्या पेंट्सचा, डिझाईनर फिनिशचा आणि वॉलपेपर्सचा अनुभव घेऊ शकतील. पेंटिंग केवळ एक साधेसे काम नसून व्यक्तिगत कहाणी अभिव्यक्त करणाऱ्या जागेत रूपांतरित करणारी ती एक कला असली पाहिजे ही आमची दृष्टी आहे. हा विस्तार म्हणजे इनोव्हेशन, सुविधा आणि ग्राहकांसाठी उत्कृष्टता सुनिश्चित करत भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा डेकोरेटिव्ह पेंट ब्रँड बनण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल आहे.

# महिलांचे अतुलनीय योगदान व सामर्थ्याला सलामी

**मुंबई, मार्च ०६, २०२५:** टेलिव्हिजनवरील महिला केवळ काल्पनिक पात्रं नसतात तर ते समाजाचे प्रतिबिंब असतात. ज्यातून भारतभरातील प्रेक्षकांना लवचिकता, आशा आणि प्रेरणा मिळते. सोनी सबने आजवर पडद्यावर कणखर नायिका दर्शवल्या आहेत. ज्या स्वत:चे सामर्थ्य स्वीकारतात आणि वास्तविक जीवनातील महिलांप्रमाणे अनेक भूमिका सहजपणे पार पाडतात. यंदाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, सोनी सबवरील काही उल्लेखनीय अभिनेत्रींचा सन्मान करणार आहोत. ज्या मनोरंजनासोबतच शक्तिशाली पात्रांद्वारे अनेकांच्या आयुष्यात प्रेरणेचा स्रोत बनल्या आहेत.

अभिनेत्री करुणा पांडे ही सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करते. स्वत:वर प्रेम करण्याचे शिकवत ती समाजातील लाखो महिलांसाठी सामर्थ्याचे प्रतीक बनली आहे.


सोनी सबवरील वागळे की दुनिया मालिकेत वंदनाची भूमिका करणारी परीवा प्रणती हिने करिअर आणि कुटुंबाचा समतोल साधण्याबाबत मत व्यक्त केले.

अभिनेत्री सायली साळुंखे हिने वास्तविक जीवनातील महिलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भूमिका साकारल्या आहेत. ज्या महिला पालनपोषण करतात, नेतृत्व करतात, लढतात.. आता सोनी सबच्या वीर हनुमान मालिकेत ती अंजनीची भूमिका साकारणार आहे.

आयुष्यात अनेक भूमिका साकारत कणखर आणि कठोर परिश्रम घेणाऱ्या महिलेची भूमिका भिनेत्री बरखा बिश्त हिने सोनी सबवरील तेनाली रामा मध्ये काली मातेची भूमिका केली आहे.

सोनी सबवरील प्रेरणादायी महिला आणि अज्ञात नायकांच्या प्रवासात सहभागी व्हा! पहात रहा.. पुष्पा इम्पॉसिबल, वागळे की दुनिया, वीर हनुमान आणि तेनाली रामा.. कारण यात आयुष्यातील आव्हानांना सामोरे जात अधिक कणखर बनून बाहेर पडण्याचा प्रवास दर्शवण्यात आला आहे.

## कृतज्ञता आणि सक्षमीकरणाच्या शक्तिशाली संदेशांसह
# महिला दिन साजरा!



**मुंबई, मार्च ०६, २०२५:** महिलांच्या हक्कांच्या चळवळीतील एक महत्त्वाचा क्षण म्हणून दरवर्षी ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. विविध क्षेत्रातील महिलांच्या योगदानाची ओळख करण्यासाठी, लिंग समानतेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि महिलांच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठीचा हा दिवस आहे. या खास प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर, झी टीव्हीवरील लाडके कलाकार जागृति -एक नई सुबह मधील रचना मिस्त्री, कुमकुम भाग्य मधील अक्षय देव बिंद्रा, जमाई नं. १ मधील सिमरन कौर, जाने अनजाने हम मिले मधील भरत अहलावत, कैसे मुझे तुम मिल गये मधील किशोरी शहाणे आणि वसुधा मधील अभिषेक शर्मा हे त्यांच्या जीवनातील महिलांच्या भूमिकेचे महत्त्व आणि ते हा दिवस कसा साजरा करणार आहेत याबद्दल सांगत आहेत.

झी टीव्हीवरील 'कुमकुम भाग्य' या मालिकेत रौनकची भूमिका साकारणारा अक्षय देव बिंद्रा म्हणाला, या महिला दिनी, आपण केवळ महिलांच्या अविश्वसनीय कामगिरीचा उत्सव साजरा करू नकोया तर खऱ्या समानतेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रवासाची दखल देखील घेऊया.

'कैसे मुझे तुम मिल गये' या मालिकेत बबिताची भूमिका साकारणाऱ्या किशोरी शहाणे म्हणाल्या, महिला दिन हा आपल्याला आठवण करून देतो की आपण किती पुढे आलो आहोत आणि जेव्हा आपण एकत्र उभे राहतो तेव्हा आपण आणखी किती पुढे जाऊ शकतो.

'वसुधा' या मालिकेत देवांशची भूमिका साकारणारा अभिषेक शर्मा म्हणाला, माझ्यासाठी महिला दिन हा आपल्या आयुष्यातील महिलांच्या चिकाटी, हुशारी आणि त्यांच्या अमर्याद योगदानाचा सन्मान करण्याबद्दल आहे. आपल्या आई आणि बहिणींपासून ते सहकाऱ्यांपर्यंत आणि मैत्रिणींपर्यंत, त्या जगाला कशा प्रकारे आकार देतात या गोष्टीला आपण अनेकदा गृहीत धरतो.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांद्वारे जैवतंत्रज्ञानाची मागणी

## नॅशनल फार्मर्स एम्पॉवरमेंट इनिशिएटिव्हद्वारे पत्रकार परिषदेचे आयोजन




**नागपूर, ६ मार्च** भारतातील कृषी क्षेत्रात जैव तंत्रज्ञानाच्या वापराबाबत जोरदार चर्चा सुरु आहेत. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील प्रगतशील शेतकऱ्यांनी विज्ञानाधारित धोरणांची मागणी केली असून प्रगत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा आपला हक्क अधोरेखित केला आहे. नॅशनल फार्मर्स एम्पॉवरमेंट इनिशिएटिव्ह अर्थात एनएफईआयच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी शाश्वत आणि उत्पादनक्षम शेतीसाठी जैव तंत्रज्ञानाच्या महत्त्वावर भर दिला.

विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी जैव तंत्रज्ञानासह अनुवांशिकरित्या सुधारित (जीएम) वाणांची पिके उपलब्ध करून देण्याची मागणी केली.इतर क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग होत असेल तर शेती सुद्धा मागे राहता काम नये असे त्यांचे म्हणणे आहे. जीएम पिकांमुळे कीटकनाशक आणि रासायनिक खतांचा अधिक वापर होत असल्याचा समज चुकीचा असून, जगभरात या पिकांच्या लागवडीमुळे प्रत्यक्षात रासायनिक वापर कमी झाला आहे, असे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले. अमेरिका, ब्राझील आणि अर्जेंटिना यांसारख्या देशांतील शेतकरी अनेक वर्षांपासून या तंत्रज्ञानाचा लाभ घेत आहेत, पण भारतीय शेतकरी अद्याप त्यापासून वंचित आहेत, असे त्यांनी सांगितले.

वांगे, मोहरी, कलिंगड आणि सोयाबीन यांसारख्या पिकांसाठी जैवतंत्रज्ञानाची मागणी होत असतानाच, शेतकऱ्यांनी कापसाचे महत्त्व अधोरेखित केले आणि नवीन बीटी वाण आणण्याची गरज असल्याचे सांगितले.

## एचडीएफसी बँकेचा भारतीय हवाई दल आणि सीएससी अकादमी अंतर्गत सामंजस्य करार

### प्रोजेक्ट हक्क (हवाई अनुभवी कल्याण केंद्र) ची सुरुवात

**नवी दिल्ली, मार्च ०६, २०२५:** भारतातील अग्रगण्य खाजगी बँक- एचडीएफसी बँकेने आज सहाय्यक हवाई दल प्रमुख-अकाऊंट्सआणि हवाई निवृत्त सैनिक यांच्या कार्यलयाच्या माध्यमातून भारतीय हवाई दल तसेच सीएससी अकादमीसोबत सामंजस्य करार केला. या दिवसाच्या निमित्त प्रोजेक्ट हक्क (हवाई अनुभवी कल्याण केंद्र) ज्यांनी सेवा केली, त्यांची सेवा करणे या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. संरक्षण क्षेत्रातील निवृत्ती वेतनधारक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना मदत व सेवा पुरवण्यासाठी प्रोजेक्ट हक्कची आखणी करण्यात आली आहे.

सुरुवातीला नवी दिल्ली, बंगळुरू, गुडगाव, पुणे, सिकंदराबाद, गुवाहटी, जोधपूर आणि चंदीगड यांसारख्या हवाई दल युनिटमध्ये २५ केंद्र प्रस्तावित करण्यात आली आहे. एचडीएफसी बँक आपल्या परिवर्तन कार्यक्रमाअंतर्गत संरक्षण सेवा संरक्षण क्षेत्रातील निवृत्त सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता आर्थिक समावेशकता प्रदान करेल. बँक, कॉमन सर्व्हिस सेंटर ई गव्हर्नन्स लिमिटेडद्वारे चालवल्या जाणाऱ्या सीएससी अकादमीच्या मदतीने आर्थिक उत्पादने आणि सेवासाठी कौशल्य विकास आणि प्रशिक्षण प्रदान करेल. जेणेकरून ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील.

सामंजस्य करारावर स्वाक्षरीच्या वेळी एअर मार्शल पी.के. घोष एव्हीएसएम-एअरऑफिसर इन चार्ज डमिनिस्ट्रेशन, श्रीमती स्मिता भगत, ग्रुप हेड एचडीएफसी बँक, श्री. संजय राकेश, अध्यक्ष, सीएससी अकादमी आणि भारतीय हवाई दल, एचडीएफसी बँक आणि सीएससी ई-गव्हर्नन्सचेतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्री सत्येन मोदी, कार्यकारी उपाध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख, अल्टरनेट बँकिंग चॅनेल्स आणि पार्टनरशिप -एचडीएफसी बँक, एअर व्हाईस मार्शल उपदेश शर्मा व्हीएसएम सहाय्यक हवाई दल प्रमुख (लेखा आणि हवाई निवृत्त सैनिक) आणि श्री प्रवीण चांदेकर, सीईओ-सीएससीअकादमी यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

# ॲक्सिस बँक ठरली गिफ्ट सिटी

## आयएफएससीमधील आंतरराष्ट्रीय बँकिंग युनिटद्वारे विमान वित्तपुरवठा करणारी पहिली भारतीय बँक

**नागपूर, मार्च २०२५:** भारतातील आघाडीच्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने गिफ्ट सिटी आयएफएससीमधील आपल्या आंतरराष्ट्रीय बँकिंग युनिटद्वारे (आयबीयू) विमान वित्तपुरवठा व्यवहार यशस्वीपणे पूर्ण केला असून असा व्यवहार करणारी पहिली भारतीय बँक होण्याचा मान मिळवला आहे. याबाबतचा ऐतिहासिक करार एआय फ्लीट सर्व्हिसेस लिमिटेडशी (एआयएफएस) करण्यात आला. ही कंपनी एअर इंडियाची (टाटा समूहाची पूर्ण मालकीची उपकंपनी) भाडेपट्टी सेवा शाखा आहे. या महत्वपूर्ण टप्प्यामुळे पारंपरिकपणे बहुराष्ट्रीय बँकांच्या वर्चस्वाखाली असलेल्या भारतीय विमान वित्तपुरवठा क्षेत्रात मोठी प्रगती साधली गेली आहे, तसेच गिफ्ट सिटीला विमान भाडेपट्टी आणि वित्तपुरवठ्याच्या उदयोन्मुख केंद्राच्या रूपात बळकटी मिळाली आहे.

ॲक्सिस बँकेने केलेला हा करार ३४ प्रशिक्षण विमानांच्या खरेदीसाठी दीर्घकालीन कर्ज अमेरिकी डॉलरमध्ये प्रदान करण्यासंदर्भात आहे. ही विमाने महाराष्ट्रातील अमरावती येथे एअर इंडियाच्या नवीन वैमानिक प्रशिक्षण संस्थेत तैनात केली जाणार आहेत.

# आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट

## सद्यस्थितीत शेयर बाजारात सुरु असलेल्या चढ-उतारांवक्षात करत निश्चित उत्पन्न देणारा नवीन प्लॅन

अकोला, ७ मार्च : आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा नवा दीर्घकालीन बचत प्लॅन सादर केला आहे, जो ग्राहकांना निश्चित उत्पन्नाची खात्री देतो आणि त्यांना गरजेच्या वेळी पैसे काढण्याची सुविधा देतो.

या प्लॅनमध्ये ग्राहकांना अनेक लवचिक पर्याय उपलब्ध आहेत. निश्चित उत्पन्न कधी सुरू करायचे, निश्चित उत्पन्नाचा कालावधी, परिपक्वतेच्या म्हणजेच प्लॅनच्या मॅच्युरिटीवेळी ठराविक रक्कम मिळविण्याचे स्वातंत्र्य या प्लॅनमध्ये आहे. याशिवाय, यामध्ये जीवन विमा देखील आहे, जो कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.

या प्लॅनची खासियत म्हणजे वाढत्या उत्पन्नाचा पर्याय, ज्यात उत्पन्न दरवर्षी ५% चक्रवाढ दराने वाढते. यामुळे महागाईच्या काळात देखील आर्थिक व्यवस्थापन करण्यास मदत होईल.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरतर्फे ऑल न्यू मॅन्युअल ट्रान्समिशन लेजेंडर ४४ सादर



बंगळुरू, ५ मार्च : वाढत्या स्टायलिश, साहसी आणि उच्च-कार्यक्षम एसयूव्हीच्या मागणीला प्रतिसाद देत, टोयोटा किर्लोस्कर मोटर अर्थात टीकेएम ने आज टोयोटा लेजेंडर ४४ मॅन्युअल ट्रान्समिशन असलेली एसयूव्ही सादर केली आहे. थ्रिल-प्रेमीड्रायव्हर्ससाठी डिझाइन करण्यात आलेली ही नवी एसयूव्हीची श्रेणी पॉवर, लक्झरी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे परिपूर्ण मिश्रण सादर करते.

२०२१ मध्ये भारतीय बाजारात पदार्पण केल्यापासून लेजेंडर एसयूव्हीने आपल्या ४४ क्षमतांमुळे ऑफ-रोड सफारींसाठी परिपूर्ण साथीदार म्हणून ओळख मिळवली आहे. या एसयूव्हीमध्ये अतुलनीय ताकद देणारे शक्तिशाली २.८ लिटरचे डिझेल इंजिन असून , ती २४० पीएसची पॉवर आणि ४२० एनएम टॉर्क निर्माण करते ज्यामुळे वाहनचालकास आपल्या वाहनावर संपूर्ण नियंत्रण मिळते. यातील ६-स्पीड मॅन्युअल ट्रान्समिशनमुळे अचूकता वाढते आणि रोमांचक प्रवासाचा आनंद मिळतो. टोयोटाची प्रगत ४४ तंत्रज्ञान प्रणाली कोणत्याही प्रकारच्या भूप्रदेशावर सहज वाहन चालविण्याची क्षमता प्रदान करते, ज्यामुळे ही एसयूव्ही शहरांतर्गत प्रवास आणि ऑफ रोड सफारीसाठी एक आदर्श साथीदार बनते.

## शालिनीताई मेघे रुग्णालयात अत्याधुनिक ४डी अल्ट्रासाउंड मशीनचे उद्घाटन

### गरजवंत गरीब समुदायाला अत्याधुनिक गर्भ निदान सुविधा उपलब्ध





**नागपूर, ६ मार्च :** गरजवंत गरीब समाजातील माता व नवजात बालकांसाठी अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने वानाडोंगरीस्थित शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे आज अत्याधुनिक ४डी अल्ट्रासाउंड मशीन चे उद्घाटन करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ ईस्ट आणि अमेरिकेतील रोटरी क्लब ऑफ लेक ॲरोहेड यांच्या सहकार्याने हा ऐतिहासिक प्रकल्प साकारल्या गेला.

ॲडव्हान्स अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी सपोर्टींग फिटल डायग्नोसिस या ग्लोबल ग्रँट प्रोजेक्ट जीजी २४६२५०३ अंतर्गत हा प्रकल्प हाती घेण्यात आला असून, गरजू गरीब महिलांना आधुनिक आणि परवडणाऱ्या आरोग्य निदान सेवा पुरविण्यासाठी हे मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. ३८ लाख किमतीची ही अत्याधुनिक मशीन रोटरी ग्लोबल ग्रँट प्रोग्रॅम अंतर्गत दान देण्यात आली आहे. या प्रगत तंत्रज्ञानाने लवकर गर्भ निदान होऊन गर्भाशयाशी निगडित आवश्यक उपचार वेळेत करता येतील. यासह दरवर्षी ४०-५० लाख रुपयांच्या मोफत व

## ''अंगूरी भाबीची भूमिका साकारण्याचा कंटाळा येईल, असे मला वाटत नाही'': शुभांगी अत्रे

**मुंबई, मार्च ०६, २०२५:** एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अंगूरी भाबीची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेल्या अभिनेत्री शुभांगी अत्रे यांनी नुकतेच उत्साहवर्धक नवीन प्रवास सुरू केला. मालिकेने १० गौरवशाली वर्षे पूर्ण केली आहेत आणि आपल्या सिनेमॅटिक प्रवासाला सुरूवात केली आहे. दशकापासून प्रेक्षकांना हसवून-हसवून लोटपोट करणारी ही लोकप्रिय मालिका आता मोठ्या पडद्यावर येत आहे, जेथे शुभांगी बहुप्रतिक्षित चित्रपटामध्ये त्यांच्या लोकप्रिय भूमिकेला साकारणार आहेत.

# शब्दकोडे क्रमांक २०५४




**आडवे शब्द :-**
१) सुरळीत चालू असलेल्या कामास अडथळा निर्माण करणे या अर्थाची म्हण
८) कहाणी
९) मिठी
१०) सोन्याचा धागा
११) छाती
१२) एक तारवाद्य
१३) मणका
१५) बागेतील किंवा रानातील सहल, जेवण इ.
१७) मेदिनी
१९) चुकवणारा
२१) मौल्यवान रत्ने
२३) एकत्र जमलेल्या लोकांचा समूह
२४) सर्वत्र सांगत सुटणे
२६) नमस्कार
२७) करगोटा
२९) गावाचा कारभार पाहणारा
३२) पशू
३४) सक्षम *** रामदासस्वामी
३६) उपस्थित
३७) प्रचंड, मोठा
३८) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
३९) मोठा समुद्र
४०) वाळ्याचे सुगंधी मूळ
४२) टिकून राहाणे
४४) कवाड
४५) तरतरी आणणारे एक उष्ण पेय
५०) रंग (इं.)
५१) बेडकांचे ओरडणे
५४) पुरुष
५५) सारखा
५६) एक तारवाद्य
५७) व्यापारी फायदा
५९) एकाद्या कार्यास आयुष्य वाहणे
६३) कप्पा, खण
६४) चांदी
६६) मोठी जाड सुई
६७) व्रत
६९) कच्चा पूल
७१) सदन
७२) आश्चर्य
७३) अथवा
७४) सर्वस्व
७५) धातूचा धागा

**उभे शब्द :-**
१) गडीमाणसे
२) बारीक केस
३) पशुंची गर्भावस्था
४) शरम
५) लापशी
६) एक खाद्य पदार्थ
७) गावजेवण
८) गुणांची चाहा करणारा
१२) खळबळ उडवून देणारी (घटना)
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) अंजनाचा एक प्रकार
१५) पाट्याचा जोडीदार
१६) लोक, प्रजा
१८) मलई
२०) वेळ, मृत्यू
२२) शेत, जाणे येणे
२५) कडू चव
२८) व्यायाम
२९) श्रीकृष्णाचे एक नाव
३०) लाट
३१) मानवी कत्तल
३२) उग्र, मवाळच्या विरुद्ध
३३) युद्धासाठी उत्सुक असलेला
३४) विषम च्या विरुद्ध
३५) मंदिराचा मुख्य दरवाजा
३७) दौंड जवलचे एक रेल्वे जंक्शनचे गाव
४१) श्रीविष्णूचे दहा अवतार
४३) जाणे
४५) चालणे, चालू नाणे
४७) शुद्ध, पवित्र
४९) जय पराजय
५०) अर्ध वर्तुळाकार
५२) ढीग
५३) वाघ-सिंहाचे ओरडणे
५५) सदोदित
५८) विवाहविच्छेद
६०) कैफ, धुंदी
६१) मजबूत, दणकट
६२) पडणे
६५) वेगवान
६८) प्रामाणिक
७०) अवधान, लक्ष
७१) दाट, ढग

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## पोलिसांची धडक कारवाई; अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त !




**अकोला** :डीवायएसपी किरण भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची मोठी कारवाई अवैध गोहत्या प्रकरण उघड कित्येक महिन्यांपासून कुरेशीपुरा, दहिहांडा येथे सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यांवर अखेर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. धडझ किरण भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी छापा टाकून ५०० किलो मांस आणि चार जिवंत गोवंश जप्त केले.पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अजीम अहमद मोहम्मद कासम हा आपल्या घरात अवैधरीत्या गोवंश कत्तल करत असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनीपंच आणि अधिकाऱ्यांसह त्याच्या घरावर धाड टाकली. छाप्यात अजीम अहमद आणि त्याचे साथीदार रंगेहाथ पकडले गेले. घटनास्थळी गोवंश अवशेष, धारदार शस्त्रे आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी अजीम अहमद मोहम्मद कासम, नाय मोहम्मद तौहीद शेख, मोहम्मद इस्माइल शेख आणि मोहम्मद आरिफ शेख यांच्यावर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा आणि प्राण्यांच्या छळविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी जिवंत गोवंश सुरक्षित ठिकाणी हलवले आहेत.

## तलाठी कार्यालतील पाळीव कुत्र्यांचा अनेकांना चावा

**▪तेल्हारा,दि ८ (प्रतिनिधी):**
हिवरखेड येथील महिला तलाठी विद्या मावळे पाळीव कुर्त्यांनी आतापर्यंत अनेक जणांना चावा घेतल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. पाळीव कुर्त्यांना लगाम घालण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरले आहे.



तलाठी विद्या मावळे यांच्या घरीच तलाठी कार्यालय आहे. त्यामुळे दररोज शेकडो शेतकरी व नागरिकांची ये जा सुरू असते.विद्या मावळे यांनी अनेक वर्षांपासून कुत्रे पाळलेले आहेत. कुर्त्यांनी आतापर्यंत अनेक नागरिकांना आणि जनावरांना चावा घेतला आहे. त्या कुर्त्यांमुळे इतर नागरिकांच्या आणि प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याने गावातील नागरिक धास्तीत आहेत. आतापर्यंत दोन नागरिकांच्या बकऱ्या कुर्त्यांनी चावा घेतल्यामुळे दगावल्या. कार्यालयात २४ तास कुर्त्यांचा वावर असल्याने शेतीच्या आणि महत्त्वाच्या कामासाठी तलाठी कार्यालयात येण्यास शेतकरी धजावत नाहीत. यापूर्वीसुद्धा अनेक जणांना त्यांच्या कुर्त्यांनी चावा घेतल्या बाबत बराच वादंग झालेला आहे. अनेक प्रकरणे पोलीस स्टेशनमध्ये गेलेली आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत तक्रारी केल्या आहेत. तरी सुद्धा सदर तलाठ्याच्या पाळीव कुर्त्यांवर लगाम लावण्यात प्रशासनाला सपशेल अपयश आलेले आहे.

सहा मार्च रोजी त्यांचे शेजारी मीनाबाई गजानन बेलूरकर, ५८, या घरकाम करत असताना तलाठी महिलेच्या पाळीव कुर्त्याने मिनाबाई यांच्या पायाचा लचका तोडला. मिनाबाईच्या पायाला गंभीर दुखापत झाली. कुटुंबीयांनी त्यांना प्राथमिकपान आरोग्य केंद्रात नेले. पायाची गंभीर जखम बघता अकोला सामान्य रुग्णालयात रेफर करावे लागले. मिनाबाईच्या फिर्यादीवरून हिवरखेड पोलिसांनी आरोपी विद्या मावळे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २९१ नुसार गुन्हयाची नोंद केली आहे. दोषी महिलेवर कारवाई व्हावी माझ्या आईला कुर्त्याने चावा घेतला.

## सिटी हॉस्पिटलमध्ये पहिली माइट्रल वाल्व रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया

### हृदयाच्या झडपे ची शस्त्रक्रिया

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी):**
सिटी हॉस्पिटलला एक महत्त्वपूर्ण वैद्यकीय उपलब्धी जाहीर करताना अभिमान वाटतो. सिटी हॉस्पिटल मधिल आमची पहिली माइट्रल वाल्व रिप्लेसमेंट (एमव्हीआर) शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. ही खुली हृदयाची शस्त्रक्रिया उच्च दर्जाची हृदय रोगाची काळजी पुरवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा एक नवीन अध्याय आहे.

२६ फेब्रुवारी, २०२५ रोजी दाखल झालेल्या रुग्णाला माइट्रल स्टेनोसिस (एमएस) आणि हृदयाचे अपुऱ्या रक्तपुरवठ्याच्या आजाराने ग्रस्त (सीसीएफ) सह ऱ्हमॅटिक हृदयरोग (RHD)चे निदान करण्यात आले. शस्त्रक्रियेची तातडीची गरज ओळखून, आम च्या समर्पित टीम ने, मान्यवर डॉ. अंबरीश खाटोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली, १ मार्च, २०२५ रोजी महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत चतठ शस्त्रक्रिया केली.शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

आणि रुग्णाचे बरे होण्याचे प्रमाण सुचारूपणे पुढे गेले. ६ मार्च, २०२५ रोजी, तिला चांगल्या आरोग्य स्थितीत रुग्णालयातून आनंदी आणि समाधानी चेहऱ्याने सुट्टी देण्यात आली. हा यशस्वी परिणाम सिटी हॉस्पिटल हृदय रोग तज्ज्ञांच्या कौशल्य आणि समर्पण तसेच सिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक सुविधांचे प्रमाण आहे. आम्ही आमच्या सर्व रुग्णांना उच्च दर्जाची, काळजी पुरवणे सुरू ठेवण्यासाठी वचनबद्ध आहोत.

असे सिटी हॉस्पिटल मधिल डॉक्टरांनी सांगितले हि यशस्वी शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉ अंबरीष खटोड, डॉ. रोहण भागडे, डॉ बिनत सिन्हा, व सिटी हॉस्पिटल मधिल नर्स यांनी परिश्रम घेतले. असे सामाजिक कार्यकर्ते तथा रुग्णसेवक उमेश इंगळे यांनी कळविले आहे.

## बंगरुळूवरुन श्रीलंकेला पळून जातांना मुख्य सूत्रधार अडकला जाळ्यात

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी):**
जिल्ह्यातील ग्रामीण भागात आंतरराज्य टोळीने क्रिकेट व इतर खेळावर ऑनलाइन सट्टा लावण्याचे केंद्र तयार केले होते. अकोला स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अत्यंत शिताफीने छापा टाकून तब्बल ३३ आरोपींना रंगेहात जेरबंद केले. या प्रकरणात मुख्य सूत्रधाराच्या मागावर असलेल्या पोलिसांनी बंगरुळूवरून श्रीलंकेला पळून जाण्याच्या नादात असलेल्या आरोपीला अटक केली. 'एलओसी' (लुक आऊट सरक्युलर) द्वारे अटकेची अकोला ही पहिली कारवाई ठरली आहे. ऑनलाइन सट्ट्याचे आंतरराष्ट्रीय धागेदोरे असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

जिल्ह्यातील कातखेड शिवारात रवींद्र पांडे यांच्या शेतातील तीन मजली इमारतीमध्ये अवैधरित्या विनापरवाना पैशांचे ऑनलाइन खेळ खेळले जात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शंकर शेळके यांना मिळाली. १८ फेब्रुवारीला पोलीस अधिकारी व पथकाने सुनियोजित छापा टाकला. यावेळी ३३ आरोपी आढळून आले. संकेतस्थळ व ॲपचा वापर करून क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, टेबल टेनिस,बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, कसिनोगेम, ऑनलाईन गेम आदीचा सट्टा आरोपी चालवत होते. व्हॉट्सअप, टेलिग्राम सारख्या समाज माध्यमांच्या समुहावरून त्याची जाहिरात करून ग्राहक मिळवले जात होते. ग्राहकांकडून ऑनलाइन पैसे घेऊन त्यांची आयडी तयार केली जात होती.त्यांच्या आयडीवर सट्टा खेळवून जिंकलेल्या किंवा हरलेल्या पैशांची देवाण – घेवाण करण्यात येत असल्याचे आढळून आले.मालक रवींद्र पांडे याने सट्टा चालविण्यासाठी संजय गुप्ता व मोनीश गुप्ता यांना जागा उपलब्ध करून दिली होती. त्यांनी फरार आरोपी महेश डिक्कर रा. लोहारी ता. अकोट याच्या माध्यमातून आरोपींची टोळी जमवली होती. तपासादरम्यान, आरोपी महेश डिक्कर प्रशिक्षण घेण्यासाठी दुबई येथे गेल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही फरार आरोपींच्या पासपोर्ट माहिती करून 'एलओसी' (लुक आऊट सरक्युलर) उघडण्यात आली होती. आरोपी महेश डिक्कर हा नागपुर, चैन्नई, हैदराबाद, बंगरुळू येथून अनेक वेळा श्रीलंका व दुबई येथे गेल्याचे समोर आले. महेश डिक्कर हा बंगरुळू आंतराष्ट्रीय विम ानतळावरून विमानाने श्रीलंका येथे पळून जाण्याच्या बेतात असतांना विमातळ प्रशासनाकडे 'एलओसी' प्राप्त असल्याने आरोपीला अडवून ठेवले. अकोला स्थानिक गुन्हे शाखेला याची माहिती दिल्यावर पोलीस पथकाने तत्काळ विमानाने बंगळुरू गाठून आरोपीला ताब्यात घेतले.

## जागतिक महिलादिनी कशिश खान व जैनब खान यांनी केला कर्तुत्ववान महिलांचा सत्कार





**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी):**
महिला काँग्रेसच्या उपाध्यक्ष कशिश खान आणि जैनब खान जगीरदार महासचिव यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अवसरावर महिलांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना सन्मान आणि आभार व्यक्त केले. या संधीवर महिला पोलिस कर्मी, डॉक्टर, शिक्षिका आणि कामकाजी महिलांचा सत्कार करण्यात आला.कशिश खान यांनी या सत्कारादरम्यान सांगितले, महिला समाजाच्या कणा आहेत आणि त्यांना प्रत्येक क्षेत्रात समान दर्जा मिळायला पाहिजे.

महिला पोलिस कर्मी, डॉक्टर, शिक्षिका आणि कामकाजी महिला समाजात महत्त्वपूर्ण योगदान देतात आणि आज आम्ही त्यांचा सन्मान करीत आहोत. कशिश खान यांनी पुढे सांगितले, महिला दिवस हा महिलांच्या यशस्विता आणि त्यांच्या संघर्षाला मान्यता देण्याचा एक उत्तम संधी आहे. समाजात महिलांना त्यांच्या कार्यासाठी सन्मानित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून त्यांना अधिक प्रेरणा आणि आदर मिळेल.या कार्यक्रमात महिला पोलिस कर्मी, डॉक्टर, शिक्षिका आणि कामकाजी महिलांना त्यांचा समर्पण आणि सेवेबद्दल सन्मानित करण्यात आले.

## उपविभागीय कार्यालयावर मुर्तिजापुर येथे सोमवारी मोर्चा

### समस्त बौद्ध बांधव यांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**▪मुर्तिजापुर,दि ८ (प्रतिनिधी):**
देशाचे पंतप्रधान जगभर भारत बुद्धाची भूमी असा प्रचार करित जगाची सहानुभूती मिळवित असतात दुर्दैवाने भगवान बुद्धाच्या भुमितच बुद्धाचा इतिहास आणि विचार संपविण्याचे षडयंत्र सुरु असुन केंद्र सरकार बौद्ध धर्मीय अनुयायासोबत दुधाभाव व अन्याय करून येण्याचे दिसुन येत आहे. सरकारच्या भूमिकेचा निषेध करीत महाबोधी विहाराचा संपूर्ण ताबा बौद्ध समाजाकडे असावा या प्रमुख मागणीसाठी दिनांक – १०/०३/२०२५ ला. सोमवार ११ वाजता.पु. भिक्खु संघ व समस्त बौध्द बांधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पासुन ते उपविभागीय कार्यालय मुतीजापुर पर्यंत शांततेच्या मार्गाने निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी तालुक्यातील समस्त बौद्ध बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान यावेळी करण्यात आले आहे.

## हिंगंणि बु.येथे अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा

**▪तेल्हारा,दि ८ (प्रतिनिधी):**
तालुक्यातील हिंगणी बृ येथे अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तेल्हारा तालुक्यातील हिंगणी बृ येथे दहा मार्च रोजी स्व आशाताई पोहरे याच्या स्मृती प्रित्यर्थ जगदंबा क्रीडा मंडळाच्या वतीने दहा मार्च रोजी सायंकाळी सात वाजता कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन होईल या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन आमदार नितीन देशमुख यांच्या हस्ते होईल तर कार्यक्रम अध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय खेळाडू विनायक माळी राहणार आहेत या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार साजिद खान पठाण. जिल्हा रॉष्ट्रवादि कॉग्रेसचे जिल्हा अध्यक्ष संग्राम गावंडे महेश गणगणे मंगेश काळे तहसीलदार समाधान सोनवणे. संजय अढाउ गौरव राऊत ठाणेदार गजानन राठोड हे राहणार आहेत या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५५५५५. दृतिय बक्षीस ३३३३३. तृतीय बक्षीस २२२२२ आदित्य पोहरे यांचे कडून राहणार आहे प्रवेश फ्रि ७०१ रुपये राहिल या निमित्ताने मान्यवर यांचा सम्मान करण्यात येईल तरी कबड्डी संघ यांनी या स्पर्धेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन जगदंबा क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्वयंसहायित शाळांना हरकती-सूचना नोंदविण्याचे आवाहन

**अकोला:** स्वयंअर्थसहाय्यित महाराष्ट्र शाळा अधिनियमांतर्गत नविन शाळा व दर्जावाढीसाठी प्राप्त ९ प्रस्तावांपैकी ४ शाळांचे प्रस्ताव शिफारशीसह शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ५ शाळांच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या आहेत. शिफारसप्राप्त शाळांबाबत हरकती व सूचना असल्यास १५ दिवसांच्या आत नोंदविण्याचे आवाहन माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांनी केले आहे. बाळापूर तालुक्यातील उरळ येथील श्री शिवशंकर पब्लिक स्कूल, मूर्तिजापूर येथील मूर्तिजापूर पब्लिक स्कूल, पातूर तालुक्यातील खानापूर येथील महादेव व्ही. ढोकणे प्राथमिक इंग्रजी शाळा, बाळापूर तालुक्यातील निंबी येथील बाल शिवाजी कॉन्व्हेंट यांचे प्रस्ताव शिफारशीसह शासनाकडे पाठविण्यात येतआहेत. त्याचप्रमाणे, सोनोरी (मूर्तिजापूर) येथील अल रोशनी इंग्रजी शाळा, तेल्हारा येथील श्रीमती पार्वतीबाई तापडिया कॉन्व्हेंट, शिवणी येथील बू लोटस प्राथमिक शाळा, अकोला येथील नूतन कॉन्व्हेंट व भारत विद्यालय आदी शाळांच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या आहेत. याबाबतची यादी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### ज्येष्ठ नागरिक संघ अकोला महिला समिती द्वारे

## जागतिक महिला दिनाचे आयोजन

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी):**
ज्येष्ठ नागरिक संघ अकोला महिला समितीच्या वतीने जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन नऊ मार्च रविवार ला दुपारी चार वाजता बी आर हायस्कूल अकोला च्या सभागृहात मुख्य पोस्ट ऑफिसच्या मागे येथे करण्यात आले आहे त्यामध्ये जेष्ठ आईचे पूजन विविध क्षेत्रातील मान्यवर पाच महिलांचा सन्मान आणि महिला दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धाचे पुरस्कार वितरण याचा समावेश राहणार आहे या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आरडीजी महिला महाविद्यालयातील प्रा सोनल कामे उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमात ज्येष्ठ आईच्या पूजनाचा माना करिता सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या विद्यादेवी गौरीशंकर मंत्री वय वर्ष ८७ यांची निवड करण्यात आली आहे या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक संघाच्या महिला आणि पुरुष सभासदांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महिला समिती अध्यक्ष श्रीमती संध्या संगवई सचिव सौ निशा कुलकर्णी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी सचिव प्राचार्य डॉ सत्यनारायण बाहेती आणि इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## श्री जागेश्वर सेवा समिती बोरगाव वैराळे श्रावण बाळाची भूमिका बजावणारी तीर्थ यात्रा

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी):**
श्री जागेश्वर सेवा समिती, बोरगाव वैराळे यांनी गंगा सागर आणि जगन्नाथपुरी येथे भाविकांसाठी भव्य तीर्थयात्रेचे आयोजन केले. हभप गणेश महाराज साठे व हभप गजानन महाराज रोडे यांनी या यात्रेच्या आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.धर्माचार्य हभप दादा महाराज कोळस्कर यांनी प्रवचनातून या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, प्राचीन काळात श्रावण बाळाने आपल्या आई-वडिलांना खांद्यावर कावड घेऊन तीर्थयात्रेला नेले होते. आजच्या काळात अनेक मुले काम ाच्या व्यापामुळे आपल्या माता-पित्यांना तीर्थयात्रेला घेऊन जाऊ



शकत नाहीत. अशा परिस्थितीत श्री जागेश्वर सेवा समितीच्या माध्यमातून ही यात्रा आयोजित करून, महाराजांनी खऱ्या अर्थाने आधुनिक श्रावण बाळाची भूमिका बजावली आहे.यात्रेदरम्यान, हभप दादा महाराज कोळस्कर यांनी आपल्या रसाळ वाणीमधून तीर्थस्थळांचे महत्त्व सोप्या व हृदयस्पर्शी भाषेत उलगडून सांगितले. त्यांच्या प्रवचनामुळे भाविकांच्या चेहऱ्यावर भक्तिभाव ओसंडून वाहत होता आणि संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

### जानकी वल्लभो सरकार श्रीराम हरीहर संस्था पुष्करणा चेतना संस्था वतीने

# राममंदिर येथे होली फाग उत्सवाला झाली सुरुवात

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी):**
होली आई रे होली आई रे, आज प्रज मे होली रे रसिया, तुरंगी, राधा राणी, राम, हनुमान जी चे भजन रामाचे भजन फुलांची होळी नैसर्गिक रंगाची होळी दरवर्षी परंपरा समाजातील सामाजिक समरसतेला अनुरूप कार्यक्रम मोठ्या राम मंदिरात कृष्ण भक्तांची धुमाळ हा कार्यक्रम राम आणि कृष्ण भक्तांचा संगम तसेच सुप्त गुणांना वाव देऊन समाजात प्रोफेशनल पेक्षा समाजामध्ये मातृ शक्ती, श्रद्धा आणि भक्ती विश्वासासोबत मानवतेचा कार्य करणारे भाविक भक्तांच्या मधुर वाणी परंपरागत व नवीन गीताचा संगम आनंद देणारा उत्सव साजरा करण्यात आला.






अकोला शहरातील राम आणि कृष्ण भक्तांच्या मिलनाचा व होली फाग चंग उत्सव अकोला शहरात सहा मार्चपासून सुरू झाले असून १४ मार्चपर्यंत हा उत्सव चालणार आहे. होलकाष्टकच्या दिवसापासून अकोल्या राजराजेश्वर नगरीमध्ये शहरातील शताब्दी पूर्व संत गजानन महाराज यांच्या पावन स्पर्शाने पवित्र मोठ्या राम मंदिरापासून हा उत्सव सुरू करण्यात आला मंदिराच्या अध्यक्ष सुमनदेवी विजयअग्रवाल यांच्या हस्ते पूजा अर्चना करून विशेष आराधना करून प्रत्येकाच्या जीवनामध्ये आनंद व उत्साह भक्ती आणि श्रद्धा आणि मानवतेचे कार्य करण्याची ताकद देऊ अशी प्रार्थना भगवान श्री राम आणि श्रीकृष्ण यांना करण्यात आली वेदपाठी ब्राह्मण सौरभ छगानी जनक जोशी संतोष शुक्ला हेमंत शर्मा पंडित हेमंत शर्मा राधेश्याम शर्मा चंद्रशेखर खडसे यांच्या हस्ते पूजा अर्चना करण्यात आली. शहरातील विविध मंदिर विविध धार्मिक संस्थेच्या सहकार्याने वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम होत असते अकोला पुष्करणा चेतना समिती, राधा कृपा सत्संग मंडळ, श्रीराम हरिहर संस्था, सुप्रभात सत्संग मंडळ, श्री जानकी वल्लभो सरकार धर्माथ संस्था च्या माध्यमातून हा कार्यक्रम ६ मार्च रोजी दुपारी साडेतीन ते संध्याकाळी सहा वाजता पर्यंत परंपरागत सनातन धर्माची नॅचरल रंग आणि फुलांची होळी संपन्न झाली श्रीरामे सती दादी मंगल पाठ श्री जानकी वल्लभो महिला सत्संग मंडळ, यांनी प्रभू राम आणि कृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन वैदिक पद्धतीने वेदपाठी ब्राह्मणांच्या मंत्रोच्चाराने होऊन प्रत्येकाच्या मनामध्ये आनंद उत्साह विश्वास संस्कृती व निरोगी काया ची प्रार्थना येणार असून कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते नियोजन करून समाजातील सर्व घटकांना सामाजिक समरसता सोबत प्रभू राम आणि कृष्णाच्या मित्रापासून बोध घेऊन अनुकरण आणि वंदन करण्यासाठी कर्म आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करून धर्माची ध्वजा अविरतपणे ठेवण्याचा संकल्प करण्यासाठी या उत्सवाला महत्त्व असून सुमनदेवी अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला कार्यक्रमाचे संदर्भात अनिल मानधने यांनी मार्गदर्शन केले तर या कार्यक्रमात किसन गोपाल पुरोहित गिरीश जोशी गिरीराज तिवारीपुष्पा वानखडे मीरा वानखडे मालती जोशी आचल साकला, सोनू साकला ,बाणी या परिवार राघव पुरोहित, एडवोकेट महेंद्र पुरोहित श्रीकिशन गोपाल पुरोहित कांता देवी पुरोहित अर्जुन ,थानवी मेघराज बोरा अशोक छान गाणी सौरभ छान गाणी अजय जोशी, गिरीराज पुरोहित एडवोकेट वीरेंद्र व्यास एडवोकेट महेंद्र व्यास एडवोकेट महेश व्यास कमलेश पुरोहित नटवरलाल पुरोहित प्रकाश पुरोहित कपिल पुरोहित, विनायक सांडिल्य गुरुजी, पालवे सुरेश गावंडे गजानन मानखेड सत्यनारायण पुरोहित पुखराज छगन आणि हितेश चंदाने, कृष्णा बोरा, गोपेश बोरा शक्ती पुरोहित, सतीश जोशी, विनय जोशी दिनेश जोशी हरी जोशी विजय जोशी सुबोध जोशी, संतोष पुरोहित, संगीता मागटे,कविता मानधने सुनीता जोशी शीला तिवारी राधा तिवारी शीतल अग्रवाल सोनल अग्रवाल, संजय अग्रवाल, कृष्णा राठी, माधव मानकर अर्चना अडचुले, कल्पना अडचुले, रुक्मणी पुरी, रेखा नालट आचल साकला मालती जोशी कुमार यादव यादव, आदी प्रामुख्याने उपस्थित होते ६ मार्च गुरुवार रोजी मोठ्याराम मंदिरापासून हा कार्यक्रम सुरू झालाय असून सर्व धर्मप्रेमी सनातन प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती करण्यात आली आहे.


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग

## तोडा मनाची बंधने

बोध

आपल्यापैकी प्रत्येकाने स्वत:वर काही बंधनं लादली आहेत. शारीरिक किंवा सामाजिक बंधनांपेक्षा आपण मानसिक बंधनांमध्ये अडकून पडलोय. ही बंधनं तोडण्याची क्षमता असली तरी वर्षानुवर्षांच्या नकारात्मक मानसिकतेमुळे आपण प्रयत्न करत नाही. आपला स्वत:वरचा विश्वासच उडून गेलेला असतो. आपण स्वत:ला ठराविक साच्यात गुंडाळून घेतो. त्यामुळे आयुष्यात आलेल्या अपयशाच्या साखळ्या आपल्याला भेदता येत नाहीत. एका उदाहरणाद्वारे ही बाब जाणून घेऊ. रस्त्यावरून जाणाऱ्या एका व्यक्तीला काही हत्ती बांधलेले दिसतात. या महाकाय हत्तींचा पुढचा पाय दोरखंडाने बांधलेला असतो. हत्तीसारख्या प्रचंड शक्तीशाली जीवाला साध्या दोरखंडाने बांधणं त्याला विचित्र वाटतं. हत्तीला साखळीने बांधण्याऐवजी दोरखंडाने बांधण्यामागचं कारण तो शोधू लागला. त्यातच हे हत्ती बंधनातून मुक्त होण्यासाठी कोणताही प्रयत्न करत नव्हते. यामुळे तर त्या माणसाला जास्तच



आश्चर्य वाटलं. याबाबत त्याने माहुताला प्रश्न केला. हे हत्ती शांतपणे कसे काय उभे राहू शकतात, साध्या दोरखंडाने बांधलेले असूनही मुक्त होण्याचा मार्ग त्यांना कसा मिळत नाही, असे प्रश्न त्याने विचारले. यावर माहुत म्हणाला, या हत्तींना लहानपणापासून अशाच रस्सीने बांधलं जातं. त्यावेळी हा दोरखंड भेदण्याची क्षमता त्यांच्यात नसते. अनेक प्रयत्नांनंतरही हे हत्ती दोरखंड भेदू शकत नाहीत. हे दोरखंड तोडण्यात आपण अक्षम आहोत अशी खात्री त्यांना पटते. त्यांचा स्वत:वरचा विश्वास ढळू लागतो. यामुळे मोठे झाल्यानंतरही ते तसा प्रयत्न करत नाहीत. माहुताचं हे उत्तर ऐकल्यानंतर त्याने याबाबत साधूशी चर्चा केली. त्यावर साधू म्हणाला, या प्राण्यांचा बंधनावर विश्वास आहे. त्यामुळे ते हे बंधन तोडू इच्छित नाहीत. या हत्तींप्रमाणे माणसंही अशाच बंधनात अडकलेली दिसतात. आयुष्यातल्या अपयशाला ते बंधन मानतात. हे अपयश दूर करण्याचा प्रयत्नही ते करत नाहीत. आपण हे करू शकत नाही, अशी त्यांची मानसिकता झालेली असते. अशा वेळी आपल्या मानसिक बंधनांमध्ये अडकून माणूस प्रगतीच्या सगळ्या वाटा बंद करतात. त्यामुळे आपण आपले प्रयत्न कधीही सोडू नयेत. सगळी बंधनं तोडण्याची क्षमता आपल्यात असते. स्वत:वर विश्वास ठेऊन मार्गक्रमण केलं पाहिजे. तरच तुम्ही यशस्वी होऊ शकता.

## 'असभ्यते' चं सांस्कृतिक दर्शन!

भक्ती विशेष

सगळीकडे होळीचं वातावरण रंगू लागलं आहे. होळीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या, ढपल्या, ताशा आदी सामानाने बाजारात प्रवेश केला आहे. त्याबरोबरच विविध रंगांनी भरलेल्या टोपल्याही बाजारात सजू लागल्या आहेत. होळी हा वर्षातील शेवटच्या महिन्यात येणारा एक महत्त्वाचा सण... या दिवशी पुरोहित बोलावून होलिका पूजन केलं जातं. ही होळी म्हणजे देवी आहे. तिच्या पूजनाने जीवनातील अनिष्ट प्रसंग टळतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या पेटत्या होळीला नारळ अर्पण केला जातो आणि नंतर तो काढल्यावर प्रसाद म्हणून उपस्थितांना वाटला जातो. महिला होळीसाठी केलेल्या पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करतात, त्यानंतर पाण्याची धार धरुन होळीभोवती प्रदक्षिणा घातली जाते. काही कर्मठ लोक गुळाचे साप, विंचू, झुरळ, ढेकूण बनवून होळीच्या आगीत जाळतात. हे सगळं सुरू असताना जमलेले पुरुष बोंब मारत राहतात. इंग्रजी राजवटीत त्यांच्या अन्याय्य शासनपद्धतीचा निषेध म्हणून एक बोंब ठोकली जायची. 'होळी म्हण होळी, पुरणाची पोळी... इंग्रज मेला संध्याकाळी...' अशा काही टवाळखोर घोषणा होळीभोवती दिल्या जात असल्याची आठवण वृद्धांच्या तोंडून आपल्याला ऐकायला मिळते.

जैमिनीच्या पूर्वमीमांसा सूत्रात होळी या सणाचा उल्लेख 'होलाका' म्हणून केला आहे. हा सण भारताच्या पूर्व भागात अतिशय लोकप्रिय होता. तो साजरा करण्याचे विविध प्रकार जैमिनीसूत्र, काठक गृह्यसूत्र, लिंग पुराण, हेमाद्रिचं व्रत खंड, वराहपुराणात सांगितले आहेत. या ग्रंथांमध्ये या सणासंबंधीचे अनेक प्राचीन संदर्भ आणि सण साजरा करण्याच्या पद्धती सांगितलेल्या आहेत. काठक गृह्यसूत्रामध्ये 'राकाहोलाके' नावाचं सूत्र आहे. टीकाकारांनी याचा अर्थ लावताना होलाके हा स्त्रीच्या सौभाग्य वर्धनासाठी करावयाचा एक विधी असल्याचं सांगितलं आहे. त्यात राका म्हणजे पौर्णिमा ही देवता असते. म्हणजेच पौर्णिमेच्या दिवशी केल्या जाणाऱ्या या विधीने स्त्रीचं सौभाग्य वाढतं असं यात सांगितलं आहे.

वात्स्यायनाने कामसूत्रात स्त्री-पुरुषांच्या क्रीडाप्रकारात वीस खेळ सांगितले आहेत. त्यावेळी हे खेळ कमी-अधिक प्रमाणात विविध प्रातांमध्ये खेळत असतं. त्यात 'होलाका' हा एक खेळ सांगितला आहे. यात जनावरांच्या शिगांमधून, बांबू वा तत्सम साधनांमधून एकमेकांवर रंग उडवला जात असे. यावेळी पाण्याचाही वापर होत असे. हेमाद्रीने बृहद्यमाच्या ग्रंथात होळी पौर्णिमेला 'फाल्गिनिका' म्हटले आहे. तो दिवस बालीश चेष्टा करुन, बालीशपणा करुन साजरा केल्यास संसार सुखाचा होतो असं सांगितलं आहे. यामुळे लोकांची भरभराट होते असंही हा ग्रंथ सांगतो. वराहपुराणात या पौर्णिमेला 'पटवासविलासिनी' असं म्हटलं आहे. या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंगीत पुड्या उधळून दिवस साजरा करावा असं या पुराणात सांगितलं आहे. भविष्योत्तर पुराणात कृष्ण-युधिष्ठीर संवादात रघुराजाची एक कथा सांगितली आहे. त्याच्या राज्यात 'ढुंढा' नावाची एक राक्षसी मुलांना रात्रंदिवस पीडत असे. देव वा मनुष्य यांच्यापासून तुला मरण येणार नाही, असा वर तिला ब्रह्मदेवाने दिलेला असतो. तिच्या पीडेच्या निवारणार्थ पुरोहिताच्या सल्ल्याने राजाने फाल्गुनी पौर्णिमेला घराबाहेर लाकडाचा ढीग करुन रात्रभर पेटता ठेवावा, अश्लील शब्द उच्चारुन मोठा ध्वनी करावा अशी आज्ञा दिली. आणि खरंचच त्यायोगे राक्षसी

**जैमिनीच्या पूर्वमीमांसा सूत्रात होळी या सणाचा उल्लेख 'होलाका' म्हणून केला आहे. हा सण भारताच्या पूर्व भागात अतिशय लोकप्रिय होता. तो साजरा करण्याचे विविध प्रकार जैमिनीसूत्र, काठक गृह्यसूत्र, लिंग पुराण, हेमाद्रीचं व्रत खंड आणि वराहपुराणात सांगितलेले आहेत. या ग्रंथांमध्ये या सणासंबंधीचे अनेक प्राचीन संदर्भ आणि सण साजरा करण्याच्या पद्धती सांगितल्या आहेत.**



मरण पावली. तेव्हापासून तो दिवस 'अडाडा' किंवा 'होलिका' या नावाने प्रसिद्ध आहे. वद्य प्रतिपदेला होळीच्या राखाडीला वंदन करुन, तेथे पाणी तापवून, अंगाला राख फासून स्नान करावं असं सांगितलं आहे.

होळी म्हणजे हिवाळ्याचा शेवट आणि उन्हाळ्याची सुरूवात. या दिवसात वसंताचं साम्राज्य पसरलेलं असतं. म्हणून या दिवशी चंदन आणि आम्रमोहोर यांच्या साह्याने कामदेवाची पूजा करण्याविषयीदेखील सांगितलं आहे. ही पूजा आयुष्यभर सुख प्रदान करते. जैमिनी आणि काठक गृह्यसूत्रातील संदर्भावरुन हा सण ख्रिस्तपूर्व काळात काही शतकं अस्तित्वात आणि लोक अनुभूतीत असावा असं दिसून येतं. वसंताच्या आगमनाचं स्वागत कामोद्दिपक नृत्य-गीत गायनाने करावा असं यात म्हटलं आहे. भविष्योत्तर पुराण आणि कामसूत्रातही हा सूर आळवला गेलेला दिसतो. विविध प्रांतात होलिकोत्सव परंपरेप्रमाणे एक, तीन वा पाच दिवस साजरा केला जातो. शूलपाणीलिखित 'दोला यात्रा विवेक' या ग्रंथात या सणाचं विधीविधान सांगितलं आहे.

पंढरपुरात होळीसाठी गल्ली-गल्लीतून शेणाच्या गोवऱ्या गोळा केल्या जातात. त्यासाठी 'आया-बायांनो पाच पाच शेण्या' अशी साद घालत मुलं फिरत असतात. महाद्वार घाटावर श्री विठ्ठल मंदिरातर्फे मानाची पहिली होळी पेटते. या होळीतून अग्नी आणून इतरत्र होळ्या पेटवल्या जातात. धुळवडीचा दिवस राख-चिखल एकमेकांवर टाकून साजरा केला जातो. होळी हा सण असं जुन्या-नव्याचं एक अजब मिश्रण आहे. हा दिवस धामधूमीत साजरा होतो. पुण्या-मुंबईसारख्या शहरांमध्ये घरोघरी होळी केली जात नाही तर सार्वजनिकरित्या एक होळी केली जाते. काही गणेश मंडळं होळी पेटवतात. मात्र खेडेगावामध्ये आजही घरोघरी होळी केली जाते. या दिवशी सगळे उपचार पार पडतात पण कोणी त्यामागील शास्त्र, प्रतीकं आणि संदेश जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाही. खरं तर याविषयी सखोल माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करणं गरजेचं आहे, कारण जी संस्कृती अत्यंत सभ्य, विवेक आणि सुसंस्कारित विचारसरणीचं अधिष्ठान मान्य करते, जी अमंगल वाणी, विचार यांना अपवित्र मानते, जी त्यांचा त्याग करण्याचा सल्ला देते त्याच संस्कृतीत एखाद्या सणानिमित्त अर्वाच्य भाषेच्या प्रयोगाला सांस्कृतिक मान्यता मिळते तेव्हा त्यामागे विचार होण्याची आवश्यकता आहे. हा माणसाच्या मनातील नकारात्मक भावनांचं निरसन करण्याचा एक विधी आहे असं वाटतं. सध्या शरीरातील विषाक्त घटक दूर करण्यासाठी विशिष्ट आहार सांगितला जातो. होळीसारखे सणवार मनातील विषाक्त भावनांच्या त्यागातून मनशुद्धीचा एक प्रांजळ प्रयत्न करताना दिसतात.

## मुलांच्या अभ्यासिकेत करा हे बदल

वास्तू भक्ती

सध्या परीक्षांचा माहोल आहे. यामुळे मुलं अभ्यासात गढून गेली आहेत. परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी भरपूर अभ्यास केला पाहिजे. मेहनत घेतली पाहिजे. त्याशिवाय यश मिळू शकत नाही. पण काही मुलांचं अभ्यासात लक्ष लागत नाही. पाठांतर करून काही लक्षात



रहात नाही. खूप अभ्यास केला तरी चांगले गुण मिळत नाहीत. अभ्यासिकेतल्या वास्तूदोषांमुळे असं होऊ शकतं. मुलांच्या अभ्यासिकेची रचना करताना या बाबी ध्यानात घेतल्या तर वास्तूदोष दूर होऊन त्यांना यश मिळू शकतं.

* मुलांच्या अभ्यासाचं टेबल चौकोनी असावं. गोल किंवा अंडाकृती टेबलवर अभ्यास केल्याने अपेक्षित यश मिळत नाही.
* अभ्यासाच्या टेबलच्या पृष्ठभागाचा रंग पांढरा, राखाडी किंवा फिकट गुलाबी असला पाहिजे. पृष्ठभागाचा रंग फार गडद असू नये.
* अभ्यासाच्या टेबलवर पुस्तकांव्यतिरिक्त दुसरं काहीही ठेऊ नये.
* बंद घड्याळं, तुटलेली पेनं, पेन्सिली, चाकू, सुरी, कात्री अशी हत्यारं ठेऊ नये.
* कॉम्प्युटर टेबलच्या उत्तर किंवा पूर्व दिशेला ठेवायला हवा. टेबलच्या ईशान्य कोपऱ्यात म्हणजे उत्तर-पूर्व दिशेला कॉम्प्युटर ठेऊ नये.
* अभ्यासाचं टेबल जिन्याखाली ठेऊ नये.
* स्वीच बोर्ड अभ्यासाच्या खोलीच्या ईशान्य कोपऱ्यात असू नये. ही दिशा सोडून दुसऱ्या दिशेला लावता येईल.
* अभ्यासाच्या खोलीत छोटं मंदिर किंवा देवाची मूर्ती ठेवावी.
* विद्यार्थ्यांनी देवासमोर दिवा लावायला हवा. यामुळे देवाची कृपा राहिल आणि अभ्यासात यश मिळू शकेल.

## लाभ गायत्रीमंत्राचे

मंत्रजागर

**गायत्री मंत्र हा अत्यंत शक्तीशाली मंत्र मानला जातो. या मंत्रात दैवी शक्ती असते असं मानलं जातं. गायत्री मंत्र वेदांमध्ये लिहिण्यात आला होता. या मंत्राचे शरीरावर भावनिक आणि मानसिक असे दोन्ही परिणाम होतात. गायत्री मंत्राच्या लाभांविषयी जाणून घेऊ...**

गायत्री मंत्रात चमत्कारिक शक्ती असल्याचं मानलं जातं. देवाची आराधना करताना, त्याची प्रार्थना करताना, ब्रह्मज्ञान मिळवताना, भौतिक सुखासाठी तसंच पैसा मिळवण्यासाठी गायत्री मंत्र म्हटला जातो. दिवसात तीन वेळा गायत्री मंत्र म्हणता येतो. हा मंत्र म्हणण्याच्या ठराविक वेळा आहेत. त्यापैकी एक म्हणजे संध्याकाल. तसंच सूर्योदयाआधी आणि सूर्य उगवेपर्यंत हा मंत्र म्हणता येतो.

* या वेळांव्यतिरिक्त इतर वेळी मंत्र म्हणता येतो. पण मन शांत असताना अगदी हळू आवाजात हा मंत्र म्हणायचा असतो. हा मंत्र मोठ्या आवाजात म्हणू नये.
* या मंत्राच्या उच्चारामुळे माणसात भक्तीभाव विकसित होतो. ठराविक अध्यात्मिक पातळी गाठल्यानंतर देव तुमच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करतो.
* मनातल्या वाईट विचारांमुळे, नकारात्मक भावनेमुळे लोक आजारी पडतात. गायत्री मंत्राच्या उच्चाराने या वाईट भावना दूर सारल्या जातात आणि माणसाची तंदुरूस्ती कायम राहते.
* गायत्री मंत्र नियमितपणे म्हटल्याने पुढच्या पिढ्यांना लाभ होतो. पुढच्या पिढ्या बुद्धीवान निपजतात.
* गायत्री मंत्रामुळे शांत, आनंदी कुटुंबाची खूप भरभराट होते. प्रचंड पैसा असूनही साधेपणा जपणाऱ्या लोकांना गायत्री मंत्रामुळे अनेक लाभ होतात.
* गायत्री मंत्र प्रत्येकासाठी लाभदायी मानला जात असला तरी लहान मुलांना याचे अनेक लाभ होतात. या मंत्राचं दररोज १०८ वेळा पठण केल्यास मुलांच्या मेंदूचा विकास होतो. स्मरणशक्ती सुधारते आणि आयुष्यात जे हवं ते




मिळतं.

* शत्रूंमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर दर मंगळवारी, शनिवारी आणि अमावस्येला या मंत्राचं पठण करा. यावेळी लाल कपडे परिधान करा. गायत्री मंत्र म्हणताना दुर्गा देवीचं स्मरण करा. यामुळे सगळ्या समस्यांचं निराकरण होऊ शकेल.
* लग्न ठरत नसेल तर दर सोमवारी हा मंत्र १०८ वेळा म्हणा. यावेळी पिवळी वस्त्रं परिधान करा. देवी पार्वतीचं स्मरण करा. तुम्हाला सुयोग्य जोडीदार मिळेल.
* जुनाट आणि गंभीर विकारांपासून सुटका हवी असेल तर मंगल दिवशी या मंत्राचं पठण करा. यावेळी पाण्याने भरलेला घडा किंवा तांब्या जवळ ठेवा. मंत्र म्हणताना लाल कापड अंथरून त्यावर बसा. मंत्र म्हटल्यानंतर तांब्यातलं पाणी पिऊन टाका.
* गायत्री मंत्राच्या नियमित पठणामुळे तुमच्या चेहऱ्यावर तेज येतं. त्वचा चमकदार दिसते.
* गायत्री मंत्रामुळे उत्तम आरोग्य राखता येतं. मंत्राच्या नियमित पठणामुळे जंक फूड किंवा अनारोग्यदायी पदार्थांवरून वासना उडते आणि आपलं आरोग्य चांगलं राहतं.
* डोळ्यांशी संबंधित विकार असतील तर गायत्री मंत्राचं पठण लाभदायी ठरू शकतं. यामुळे दृष्टीदोष दूर होतात.

## घालावे कोणते कपडे

जाणून घ्या

कोणतंही धार्मिक स्थळ अत्यंत पवित्र मानलं जातं. या स्थानाचं पावित्र्य आणि मांगल्य जपणं गरजेचं असतं. म्हणूनच मंदिरात किंवा कोणत्याही धार्मिक स्थानी जाताना पेहरावाला महत्त्व दिलं जातं. विशिष्ट धार्मिक स्थानी जाताना ठराविक पेहराव करणं बंधनकारक असतं. देवाच्या मूर्तीचा अभिषेक करताना रेशमी वस्त्र परिधान करण्याबाबत सांगितलं जातं. धर्मस्थळी जाताना कोणत्या प्रकारचा पेहराव करावा, याबाबत बरीच मतमतांतरं आहेत पण देवासमोर हात जोडताना आरामदायी आणि शालीन कपडे घालणं योग्य ठरतं. ही बाब स्त्री आणि पुरूष दोघांनाही लागू पडते. धार्मिक स्थानी आल्यानंतर आपलं लक्ष देवावर केंद्रित होणं गरजेचं असतं पण तंग किंवा टोचणारे कपडे घातल्यास सगळं लक्ष तिकडे लागून राहतं. अशा वेळी देवाची कृपा प्राप्त होऊ शकत नाही. देवाचं ध्यान करताना एकाग्रता महत्त्वाची मानली जाते. प्राचीन काळात ऋषी-मुनी तसंच सर्वसामान्य माणसं धोतर नेसत असतं. धोतर हा अत्यंत आरामदायी पेहराव मानला जातो. जुन्या काळात यज्ञयागांना खूप महत्त्व होतं. अशा वेळी धोतरामुळे हालचाल करणं सोपं होत



असे. त्यामुळे आराधना, यज्ञ करताना सगळं लक्ष देवाकडे केंद्रित करता येत असे. महिलाही आरामदायी पेहराव करत असत. मंदिराचं पावित्र्य राखण्याची परंपरा आजही कायम आहे. त्यामुळे मोठमोठ्या मंदिरांमध्ये पूजेदरम्यान पारंपरिक वस्त्रं घातली जातात. रेशमी वस्त्रांना प्राधान्य दिलं जातं. मंदिरात जाताना पिवळ्या किंवा लाल रंगाची वस्त्रं परिधान केली जातात. पिवळा रंग सकारात्मक मानला जातो तर लाल हा देवीचा रंग मानला जातो. या रंगाचं अध्यात्मिक महत्त्व आहे. त्यामुळे धार्मिक स्थानी जाताना पिवळ्या किंवा लाल रंगाचे आरामदायी आणि पारंपरिक कपडे घालणं योग्य ठरतं.

## मंदिर विभिषणाचं

तीर्थक्षेत्र



हिंदू धर्मात अनेक पौराणिक व्यक्तिमत्त्वं आढळतात. या धर्मातल्या ३३ कोटी देवी-देवतांची मंदिरं भारतासह जगातल्या इतर देशांमध्येही आहेत. यासोबतच काही पौराणिक व्यक्तिमत्त्वांची मंदिरंही आहेत. लंकाधिपती रावणाचा भाऊ विभिषण रामभक्त होता. रावणाचा वध करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. विभिषण हे रामायणातलं प्रमुख पात्र. या विभिषणाचं मंदिर राजस्थानातल्या कोटा शहरात आहे. या ठिकाणी कोटा-डोरिया नावाचं एक स्थान आहे. या ठिकाणी विभिषणाचं मंदिर वसलंय. हे मंदिर इसवी सन चौथ्या शतकात बांधण्यात आल्याचं बोललं जातं. मार्च महिन्यात या ठिकाणी मोठी जत्रा भरते.

या मंदिराची निर्मितीबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. त्यापैकी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. ती अशी की, अयोध्येत श्रीरामाचा राज्याभिषेक होत असताना विभिषणाने हनुमान आणि शंकराच्या मूर्तींना पालखीत बसवलं आणि तो तीर्थयात्रेला निघाला. पालखीचा स्पर्श जमिनीला होऊ द्यायचा नाही, असा संकल्प त्याने केला होता. या यात्रेदरम्यान विभिषण कोटा डोरियाच्या जवळ असलेल्या कैथून येथून जात असताना पालखीचा एक भाग कोट्याच्या रंगबाडी बालाजी या स्थानी तर दुसरा भाग चारचौमा या ठिकाणी स्पर्शून गेला. या स्थानी शंकर आणि हनुमानाचं मंदिर बांधण्यात आलं. विभिषणाचा महिमा या भागात पसरल्यानंतर चौथ्या शतकात त्याचं मंदिर बांधण्यात आलं, असं म्हणतात. विभिषणाचं हे मंदिर अनोखं म्हटलं पाहिजे.

## समूहात काम करताना...

भक्ती मनाची

आजच्या जगात टीम वर्कला महत्त्व आहे. सगळी कामं एकत्रितपणे केली पाहिजेत. आयुष्याचं ध्येय एकट्याने ठरवण्याचे, एकट्याने यश मिळवण्याचे आणि एकट्याने व्यवसाय करण्याचे दिवस केव्हाच मागे पडले आहेत. सर्वांनी एकत्र येऊन स्वत:च्या आणि व्यवसायाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी काम केलं पाहिजे. हिंदू धर्मातले ऋषीमुनी ध्यानाला बसत असत, यज्ञ करत असत तेव्हा समूहाने बसत असत. एकट्याने यज्ञ करण्याचं प्रमाण बरंच कमी होतं. कोणत्याही धर्मातल्या पूजा-अर्चनेच्या प्रथा जाणून घेतल्या तर समूह प्रार्थनेला महत्त्व दिल्याचं दिसून येतं. इस्लाममध्ये एकत्र नमाज पढला जातो. चर्चमधली प्रेयरही समूहाने होते. आरत्या करताना मंडळी एकत्र जमतात. समुहाने केलेली कोणतीही गोष्ट यशस्वी ठरते.

आता हीच बाब आपल्या व्यवसायाशी जोडून बघा. व्यवसाय किंवा नोकरीत पुढे जाताना सगळ्यांना जोडून



ठेवावं लागतं. एकट्याने काहीही होत नाही. आता तुम्ही समूहाचं नेतृत्त्व करू शकता किंवा समूहाचा एक भाग असू शकता. सगळ्यांना एकत्र घेऊन पुढे चालायचं असेल तर पूजा-अर्चनेच्या पद्धती तुमच्या कामी येऊ शकतात. त्यामुळे जीवनात पूजा, प्रार्थनेला महत्त्व देण्यात आलंय. यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात अनेक बदल घडतात. प्रत्येक व्यक्तीची दोन व्यक्तिमत्त्वं असतात. एक शारीरिक व्यक्तिमत्त्व तर दुसरं मानसिक व्यक्तिमत्त्व. शारीरिक व्यक्तिमत्त्व शरीराने कार्य करत असतं तर मानसिक व्यक्तिमत्त्वावर मनाचा प्रभाव असतो. शारीरिक व्यक्तिमत्त्व सगळं समजून घेतं पण मनातल्या गोष्टींना आवर घालणं कठीण असतं. मनात इर्ष्या निर्माण होते. हेवेदावे निर्माण होतात. वैमनस्य वाढतं. मन षडयंत्र रचू लागतं. असं होता कामा नये. यासाठी देवाची आराधना करून पुढे जायला हवं. यामुळे तुमच्यात नेतृत्त्वगुण विकसित होऊ शकतील आणि समुहात काम करणं सोपं होईल.

# ताई, एखादा भाऊ इतका बेईमान असू शकतो का?

## लाडक्या बहिणींना काँग्रेसचा सवाल




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातील महिलांना खुले पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी लाडकी बहीण योजनेवर निशाणा साधत राज्यभरातील महिलांना महायुती सरकारला धडा शिकवण्याचे आवाहन केले आहे.

विजय वडेट्टीवार आपल्या पत्रात म्हणाले की, आदरणीय ताईस, सप्रेम नमस्कार, आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या तुला खूप खूप शुभेच्छा! ताई तुझा सन्मान म्हणून सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. आम्हाला ही आमच्या बहिणीचा मान ठेवायचा होता, या योजनेचे आम्ही देखील स्वागत केले!

आपण सर्व लाडक्या बहिणींनी या सन्मान पोटी महायुतीच्या झोळीत भरभरून मत टाकली. आणि तुमच्या आशीवार्दाने सरकार सत्तेत आले. ताई, सत्ता आली पण एखादा भाऊ इतका बेईमान असू शकतो का? सध्याचे जे चित्र आहे त्यामुळे हा प्रश्न पडत आहे. निवडणुकीत मत हवी म्हणून कोणत्याही अटी शर्ती न घालत बेगडी प्रेम दाखवले. तुमच्या खात्यात आधीच ओवाळणी दिली.

निवडणुकीत भावांचे अधिक प्रेम आहे दाखवण्यासाठी महायुती सरकार आल्यास २१०० रुपये देण्याचे अभिवचन दिले होते. पण आता मात्र विविध निकष लावून तुझे नाव वगळण्याची बेइमानी सुरु केली हे अन्यायकारक आहे. मनाला खंत वाटते तुझे मत घेताना इतकी बनवाबनवी केली नव्हती, मग हेतू साध्य झाल्यावर मात्र अटी शर्ती का लावण्यात आल्या?

कोणताही भाऊ एका बहिणीशी अस वागू शकतो का हा प्रश्न नक्कीच तुला पडला असेल. मतांच्या लाचारी साठी बहिणीवर उसने प्रेम दाखवणाऱ्या या बेईमान भावांना तू माफ करशील का? एकीकडे महिलादिन, महिलांच्या कर्तृत्वाचा अभिमान, आदर आणि दुसरीकडे हेच लाडके भाऊच तुमची फसवणूक करत आहेत! ताई, या राज्यात तुला सुरक्षित वाटते का? दररोज महिला अत्याचाराच्या घटना ऐकून आम्हाला वेदना होतात.

तू आई आहेस, तू बहीण आहेस, ताई, तू एक मुलगी देखील आहेस. अनेक नात्यात गुंतलेली तू माऊली आहेस. कोणत्याही क्षेत्रात भरारी घेऊन पुरुषांच्या पुढे जाण्याची शक्ती तुज्यात आहे. पण जर तुलाच सुरक्षित वाटत नसेल तर आम्ही नालायक भाऊ ठरतो! तझ्या वेदना आमच्याही आहेत, रोज घडणारे अत्याचार बघून लाज आम्हाला ही वाटते.

तू दुर्गा, तू जिजाऊ, तू सावित्री, तू रमाई आहेस, अन्यायाविरोधात लढण्याची शक्ती तुज्यात आहे. ताई आज तरी तू शांत आहेस, तुज्यात दुःख पचविण्याची खूप क्षमता असली तरी आता मात्र तुझे रौद्र रूप या लाडक्या भावांना दाखवण्याची वेळ आली आहे. तुज्याकडून या भावाच्या इतक्याच अपेक्षा! आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पुन्हा एकदा शुभेच्छा, असे विजय वडेट्टीवार यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# तरूणांच्या टोळीकडून शिपाईची हत्या




■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ८ :** पठाणपुरा मार्गावरील भर वस्तीतील बियर बारमध्ये दोन पोलीस शिपाई व काही युवक यांच्यात शाब्दिक भांडण झाले. त्यानंतर पोलीस व युवक बार मधून बाहेर पडले.

दोन्ही पोलीस शिपाई घराकडे परत येत असताना मागून युवकांची टोळी आली आणि गल्लीत दोन्ही पोलीस शिपाई यांना गाठून गुप्तीने सपासप वार केले. या अचानक झालेल्या हल्ल्यात दिलीप चव्हाण (३६) या पोलीस शिपायाचा मृत्यू झाला तर शिपाई समीर चाफले (३४) गंभीर जखमी आहे.

ही घटना शुक्रवारी रात्री १० वाजताचे सुमारास घडली. दरम्यान जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली असून सर्रास हत्या, खून, होत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील विठ्ठल मंदिर प्रभागात राहणारे व पोलीस विभागात कॉन्स्टेबल असलेले दिलीप चव्हाण व समीर चाफले शुक्रवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास पठाणपुरा मार्गावरील वैभव बानकर यांच्या पिंक पॅराडाईज या बियर बारमध्ये साध्या वेशात मद्य प्राशन करीत बसले होते. त्याच वेळी या बारमध्ये दाद महाल वॉर्डातील काही युवक देखील मद्य पीत होते.

पोलीस शिपाई व युवकांमध्ये काही कारणावरून सुरुवातीला बाचाबाची झाली. त्यानंतर शाब्दिक भांडण हातापाईवर आले. एकमेकांना मारहाण केल्यानंतर बघून घेईल असा दम देत युवक व पोलीस शिपाई बार मधून बाहेर पडले.

पोलीस शिपाई चाफले याचे घर बियर बारच्या मागे आहे. शिपाई चाफले व चव्हाण पायदळ घराकडे जात असताना मागून युवकांची टोळी आली आणि रात्रीचा अंधार बघून गल्लीतच युवकांनी चव्हाण व चाफले या दोन्ही पोलिसांवर गुप्ती व चाकूने सपासप वार केले. यात युवकांनी चव्हाण यांच्या छातीत गुप्ती आरपार टाकल्याने तो तिथेच पडला तर चाफले यांच्या हात व छातीवर गुप्तीने वार केल्याने गंभीर जखमी झाला.

ही घटना बघून आजूबाजूचे लोक धावले आणि दोन्ही पोलीस शिपाई यांना जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तिथे डॉक्टरांनी चव्हाण यांना मृत घोषित केले तर चाफले याला डॉ. चेपुरवार यांच्या खासगी हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले आहे. त्याचीही प्रकृती गंभीर आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अति. पोलीस अधीक्षक रिना जनबंधू, शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक एकुरे घटनास्थळी दाखल झाल्या. पोलिसांनी या हत्या प्रकरणी तीन जणांना ताब्यात घेतले आहे. मागील काही दिवसांपासून शहरात गुन्हेगारी वाढली आहे. हत्या, खून प्रमाण वाढले आहे. तेव्हा गुन्हेगारांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

> दोन पोलिसांवर हल्ला करण्यात आला. त्यापैकी पोलीस शिपाई चव्हाण याचा मृत्यू झाला आहे. चाफले गंभीर जखमी आहे. त्याला खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. या प्रकरणी दाद महाल वॉर्ड येथील तीन युवकांना ताब्यात घेतले आहे. यात आणखी काही युवकांचा समावेश आहे. ते फरार आहे. त्यांचा शोध सुरू आहे.
> **मुमक्का सुदर्शन, पोलीस अधीक्षक**

# पंतप्रधान कार्यालयाने घेतली कृषी औजारे घोटाळ्याची गंभीर दखल

## चौकशी अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** नागपूर जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाच्या कृषी अवजारे वाटप योजनेत मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. पंतप्रधान कार्यालयाने या प्रकरणाची दखल घेतली असून नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटानकर यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



समाज कल्याण विभागाने २०२१-२२ मध्ये जिल्ह्यातील १०० महिला बचत गटांसाठी कृषी अवजारे वाटपाची योजना राबवली. खनिज प्रतिष्ठानकडून ८ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी मिळाला होता. प्रत्येक बचत गटाला ८.७१ लाख रुपयांचे साहित्य ९०% अनुदानावर देण्याचे नियोजन होते.

प्राथमिक चौकशीत अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. उमरेड तालुक्यातील अनेक बचत गटांना साहित्य मिळालेच नाही. काही गटांना मिळालेले साहित्य नादुरुस्त निघाल्याने परत करावे लागले. अनुदानाची रक्कम गटांच्या खात्यात जमा होताच काढून घेण्यात आली. त्रयस्थ व्यक्तींनी १०% रक्कम भरल्याचेही आढळून आले.

तपासात काही बचत गटांची प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याचे दिसून आले. काही प्रमाणपत्रांवरील तारखा दोन वर्षांपूर्वीच्या आहेत. यावरून बनावट बचत गट तयार केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. रामटेकचे खासदार श्याम कुमार बर्वे यांनी या प्रकरणाची थेट पंतप्रधानांकडे तक्रार केली होती.

# उर्दू शाळांमध्ये मोठा बदल

## मराठी अनिवार्य करून सेमी इंग्रजी माध्यमात रूपांतर<br>मदरशांमध्ये विज्ञान-आयटी शिक्षण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** राज्य अल्पसंख्याक आयोगाने महाराष्ट्रातील उर्दू शिक्षण व्यवस्थेत मूलभूत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी सांगितले की राज्यातील ९०% उर्दू शाळांची स्थिती दयनीय आहे. अनेक विद्यार्थ्यांना स्वतःचे नावही नीट लिहिता येत नाही. काही शाळांमध्ये शिक्षकांकडे बनावट पदव्या असल्याचेही निदर्शनास आले आहे.



या समस्येवर उपाय म्हणून आयोगाने सरकारकडे महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार सर्व उर्दू माध्यमाच्या शाळांचे सेमी इंग्रजी माध्यमात रूपांतर केले जाणार आहे. या शाळांमध्ये मराठी विषय अनिवार्य करण्यात येणार आहे. सरकारी नोक?्या आणि स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी विषय अनिवार्य असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

आयोगाने मदरशांसाठीही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मदरशांमध्ये केवळ धार्मिक शिक्षण न देता विज्ञान, आयटी आणि अभियांत्रिकी विषयांचे शिक्षणही बंधनकारक करण्यात येणार आहे. तसेच रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी अरबी भाषा अनिवार्य करण्यात येणार आहे. आखाती देशांमध्ये अरबी भाषेमुळे रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी हे कठोर निर्णय घेण्यात आले आहेत. या बदलांमुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळणार आहे.

# रोहितच्या नेतृत्वाखाली भारत खेळणार सलग चौथी आयसीसी फायनल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया आयसीसी स्पर्धेत सलग चौथ्यांदा अंतिम सामना खेळणार आहे. ९ मार्च रोजी दुबई येथे होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना न्यूझीलंडशी होईल. रोहितला टी-२० विश्वचषकाच्या रूपात फक्त एकच विजेतेपद जिंकता आले, तो जागतिक कसोटी अजिंक्यपद आणि एकदिवसीय विश्वचषक फायनलमध्ये पराभूत झाला.

टीम इंडियाने सलग तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. संघाने २०१३ मध्ये विजेतेपद जिंकले होते, परंतु २०१७ मध्ये पाकिस्तानविरुद्ध पराभव पत्करावा लागला. आता रोहितच्या नेतृत्वाखाली, संघाला १२ वर्षांनंतर आयसीसीचे हे विजेतेपद जिंकण्याची संधी आहे.




**कर्णधार रोहितने आयसीसीचे ८७% सामने जिंकले**

रोहित शर्माने २ टी-२० विश्वचषक, १ एकदिवसीय विश्वचषक, १ जागतिक कसोटी अजिंक्यपद आणि १ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताचे नेतृत्व केले. या ५ आयसीसी स्पर्धांमध्ये भारताने ३० सामने खेळले, २६ जिंकले आणि फक्त ४ मध्ये पराभव पत्करावा लागला.

तथापि, रोहितने गमावलेल्या ४ सामन्यांपैकी ३ सामने बाद फेरीत होते. यापैकी दोन पराभव अंतिम सामन्यात झाले. एकाच स्पर्धेत फक्त १ वेळा त्यांना २ पराभव पत्करावे लागले, ही स्पर्धा २०२२ ची टी२० विश्वचषक होती. त्यानंतर संघाला गट फेरीत दक्षिण आफ्रिकेकडून आणि उपांत्य फेरीत इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला.

**आयसीसी स्पर्धांमध्ये भारताचा दुसरा सर्वात यशस्वी कर्णधार**

आयसीसीकडे ४ स्पर्धा आहेत, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप, वनडे वर्ल्ड कप, टी-२० वर्ल्ड कप आणि चॅम्पियन्स ट्रॉफी. त्यापैकी भारताचा सर्वात यशस्वी कर्णधार एमएस धोनी आहे. ज्यांच्यामुळे संघाला ६९% सामने जिंकता आले. त्याच्या नावावर ३ आयसीसी जेतेपदे आहेत. सामने जिंकण्याच्या बाबतीत रोहित दुस?्या क्रमांकावर आहे. तथापि, त्याच्या नेतृत्वाखाली संघाला फक्त एकच विजेतेपद जिंकता आले आहे.

रोहितने २ आयसीसी एकदिवसीय स्पर्धांमध्ये १५ वेळा भारताचे नेतृत्व केले. संघाने १४ जिंकले आणि फक्त १ गमावला. तथापि, हा पराभव २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध झाला. ज्याने भारताचे घरच्या मैदानावर विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न हिरावून घेतले.

२०१७ मध्ये रोहितने पहिल्यांदाच एकदिवसीय सामन्यात भारताचे नेतृत्व केले. तेव्हापासून, त्याने ५५ सामन्यांमध्ये नेतृत्व केले आहे आणि त्यापैकी ४१ सामन्यांमध्ये संघाला विजय मिळवून दिला आहे. संघाला फक्त १२ सामने हरले. १ सामना अनिर्णीत राहिला आणि १ सामना बरोबरीत सुटला. म्हणजे यशाचा दर ७५% होता.

रोहितने भारताला सुमारे ७५% एकदिवसीय सामने जिंकून दिले. ५० पेक्षा जास्त एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व करणाऱ्या कर्णधारांमध्ये विजयाचा हा सर्वोत्तम टक्का आहे. विराट कोहली ६८% विजयांसह दुसऱ्या स्थानावर आहे आणि एमएस धोनी ५५% विजयांसह तिसऱ्या स्थानावर आहे.




# नाकारलेल्या कापसाची आकडेवारी सादर करा

## न्यायालयाचे सीसीआयला आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केंद्रीय कापूस महामंडळाला (सीसीआय) महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने राज्यात गुणवत्ताहीन ठरवून नाकारण्यात आलेल्या कापसाची केंद्रानुसार आकडेवारी सादर करण्यास सांगितले आहे.

सीसीआयने न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील १२४ कापूस खरेदी केंद्रांमधून १.४ कोटी क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे. या खरेदीसाठी शेतकऱ्यांना ९,५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे.

ग्राहक पंचायतने दाखल केलेल्या याचिकेत कापूस खरेदीत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी काही केंद्रांमध्ये शेतकऱ्यांचा कापूस खरेदी न केल्याचा आक्षेप घेतला आहे. सीसीआयने आठ ते बारा टक्के ओलावा असलेल्या कापसाचीच खरेदी केल्याचे स्पष्ट केले आहे.

महामंडळाने न्यायालयात सांगितले की, राज्यात सुरुवातीला १२१ खरेदी केंद्र सुरू करण्यात आली होती. नंतर मागणीनुसार सात नवीन केंद्र वाढवण्यात आली. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीमुळे कापसाचे उत्पादन दरवर्षी बदलते. त्यामुळे बाजाराची परिस्थिती आणि उत्पादन लक्षात घेऊन खरेदी केंद्रांची संख्या ठरवली जाते.

न्यायालयाने पुढील सुनावणीत खरेदी केलेल्या आणि नाकारलेल्या कापसाची संपूर्ण माहिती सादर करण्याचे निर्देश सीसीआयला दिले आहेत.

# ऑनलाईन सट्टयाचा सूत्रधार जाळ्यात

## श्रीलंकेला पळून जातांना पोलिसांनी आवळल्या मुसक्या

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ८ :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात आंतरराज्य टोळीने क्रिकेट व इतर खेळावर ऑनलाइन सट्टा लावण्याचे केंद्र तयार केले होते. अकोला स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अत्यंत शिताफीने छापा टाकून तब्बल ३३ आरोपींना रंगेहात जेरबंद केले.

या प्रकरणात मुख्य सूत्रधाराच्या मागावर असलेल्या पोलिसांनी बंगरुळूवरून श्रीलंकेला पळून जाण्याच्या नादात असलेल्या आरोपीला अटक केली



जिल्ह्यातील कातखेड शिवारात रवींद्र पांडे यांच्या शेतातील तीन मजली इमारतीमध्ये अवैधरित्या विनापरवाना पैशांचे ऑनलाइन खेळ खेळले जात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शंकर शेळके यांना मिळाली.

१८ फेब्रुवारीला पोलीस अधिकारी व पथकाने सुनियोजित छापा टाकला. यावेळी ३३ आरोपी आढळून आले. संकेतस्थळ व ॲपचा वापर करून क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, कसिनोगेम, ऑनलाईन गेम आदीचा सट्टा आरोपी चालवत होते. व्हॉट्सअप, टेलिग्रामसारख्या समाज माध्यमांच्या समुहावरून त्याची जाहिरात करून ग्राहक मिळवले जात होते.

ग्राहकांकडून ऑनलाइन पैसे घेऊन त्यांची आयडी तयार केली जात होती. त्यांच्या आयडीवर स?ट्टा खेळवून जिंकलेल्या किंवा हरलेल्या पैशांची देवाण-घेवाण करण्यात येत असल्याचे आढळून आले.

मालक रवींद्र पांडे याने सट्टा चालविण्यासाठी संजय गुप्ता व मोनीश गुप्ता यांना जागा उपलब्ध करून दिली होती. त्यांनी फरार आरोपी महेश डिक्कर रा. लोहारी ता. अकोट याच्या माध्यमातून आरोपींची टोळी जमवली होती. तपासादरम्यान, आरोपी महेश डिक्कर प्रशिक्षण घेण्यासाठी दुबई येथे गेल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही फरार आरोपींच्या पासपोर्ट माहिती करून एलओसी (लुक आऊट सरक्युलर) उघडण्यात आली होती. आरोपी महेश डिक्कर हा नागपुर, चैन्नई, हैदराबाद, बंगरुळू येथून अनेक वेळा श्रीलंका व दुबई येथे गेल्याचे समोर आले.

महेश डिक्कर हा बंगरुळू आंतराष्ट्रीय विमानतळावरून विमानाने श्रीलंका येथे पळून जाण्याच्या बेतात असतांना विमातळ प्रशासनाकडे एलओसी प्राप्त असल्याने आरोपीला अडवून ठेवले. अकोला स्थानिक गुन्हे शाखेला याची माहिती दिल्यावर पोलीस पथकाने तत्काळ विमानाने बंगळुरू गाठून आरोपीला ताब्यात घेतले. या आरोपीला १० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

# उलटलेल्या क्रुझरला धडकली कार

# दोघे ठार तेरा जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ८ :** समृद्धी महामार्गावर आज झालेल्या भीषण आणि तितक्याच विचित्र अपघातात दोघे भाविक ठार तर तेराजण जखमी झाले. यातील तिघा महिलांची प्रकृती गंभीर असून इतर भाविक किरकोळ जखमी आहेत.

तेरा जखमीवर नजीकच्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. मृत आणि जखमी यवतमाळ जिल्ह्यातील आसेगाव देवी (तालुका बाभुळगाव) येथील रहिवासी असल्याचे वृत्त आहे. ते शिर्डी येथे दर्शनाकरिता जात होते.

आज शनिवारी समृद्धी महामार्गावर बुलढाणा जिल्हा हद्दीतील माळ सावरगाव (तालुका सिंदखेड राजा) नजीकच्या मुंबई कॉरिडोर वर हा भीषण अपघात झाला. भाविक क्रूजर गाडीने शिर्डी येथे साईबाबाच्या दर्शनासाठी निघाले. सिंदखेडराजा जवळील माळसावरगाव येथे कॉरिडोर जवळ क्रुझरच्या डाव्या बाजूचे मागील टायर फुटल्याने क्रुझर अनियंत्रित झाली आणि उलटली. त्याच वेळी मागून क्रेटा कार भरवेगात येत होती. क्रूझर अचानक उलटल्याने चालक हर्षल भाग्यवंत यांना अंदाज न आल्याने क्रुझरला क्रेटा कार पाठीमागून भरवेगात धडकली.

यामुळे क्रूझर मधील विद्याबाई साबळे (५५) आणि मोतीराम बोरकर (६०), दोन्ही आसेगाव देवी, ता. बाभुळगाव, जिल्हा यवतमाळ, यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तसेच भावना रमेश राऊत (३०), प्रतिभा अरुण वाघोडे वय (४५), मीरा गोटफोडे (६५) ह्या तिघीजणी गंभीर जखमी झाल्या. त्यांना तात्काळ महामार्ग १०८ ॲम्बुलन्सचे डॉक्टर यासीन शहा, वैभव बोराडे चालक दिगंबर शिंदे दळवी यांनी तात्काळ जालनायेथे उपचार साठी दाखल केले.

याशिवाय क्रूझर चालक संतोष साखरकर (२८), कमला जाधव (५५), सुशीला गाणार (५२), मिरा राऊत (६०), छायाबाई चव्हाण (६५), प्रमिला घाटोळ (६०), भक्ती राऊत (५), रमेश राऊत (४०), बेबीबाई येलोत (६०), मोतीराम बोरकर (६५), सर्व राहणार आसेगाव देवी हे किरकोळ जखमी झाले. सुदैवाने क्रेटा कार मधील कोणालाही कोणत्या प्रकारची इजा झाली नाही.

अपघाताची माहिती प्राप्त होताच महामार्ग पोलीसचे पीएसआय गजानन उज्जैनकर, हवालदार मुकेश जाधव व सिंदखेड राजा पोलीस ठाण्याचे हवालदार संदीप डोंगरे, विष्णू नागरे यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमीना रवाना केले. क्यूआरव्ही टीम सिंदखेड राजाचे पवन काळे, खंडू चव्हाण, अभिषेक कांडेकर व महाराष्ट्र सुरक्षा बलचे मच्छिंद्र राठोड ,अविनाश राठोड, अजय पाटील यांनी सर्व मृतक व जखमी यांना क्रुझर मधून बाहेर काढले.